CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार दि. १० डिसेंबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ७४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## —दहावीची परीक्षा २ मार्चला, बारावीची २१ फेब्रुवारीला—

✔ **मुंबई** : दहावी व बारावी परीक्षेचे वेळापत्रक शुक्रवारी जाहीर करण्यात आले. दहावीची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहे. तसेच बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २० मार्च या कालावधीत होणार आहे. पुढील वर्षी होणाऱ्या परीक्षेचे वेळापत्रक महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडाळाने जाहीर केले.

त्यामुळे विद्यार्थांना अभ्यासाचे नियोजन करता येईल. मात्र दहावी व बारावीच्या परीक्षेसाठी कोरोना काळात दिलेल्या सवलती शिक्षण मंडळाने रद्द केल्या आहेत.कोरोना काळात विद्यार्थांना त्यांच्या शाळेतच परीक्षा केंद्र देण्यात आले होते. तसेच ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात आला होता. ही सवलत शिक्षण मंडळाने रद्द केली आहे, अशी माहिती शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दिली.



कोरोना काळात शाळा व महाविद्यालये बंद होती. शिक्षण ऑनलाईन सुरु होते. त्यामुळे परीक्षेसाठी विशेष नियम तयार करण्यात आले होते. पहिली ते नववीची परीक्षा ऑनलाईन झाली. तसेच बोर्डाच्या परीक्षेसाठी विद्यार्थांना त्यांच्याच शाळेत परीक्षा केंद्र देण्यात आले होते. परीक्षेच्या वेळेत अतिरिक्त ३० मिनिटे देण्यात आली होती.


त्यामुळे विद्यार्थांना दिलासा मिळाला होता. मात्र आता कोरोनाचे नियम शिथिल झाले आहेत. ऑनलाईन शिक्षण बंद झाले आहे. शाळा व महाविद्यालये सुरु झाली आहेत. त्यामुळे कोरोना काळात दिलेल्या सवलती बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# महाराष्ट्र-कर्नाटकात सीमावादाचा राग; दोन्हीकडे मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्यांना आग

✔ सुराज्य/सोलापूर

**कर्नाटकाला हवी आहेत महाराष्ट्रातील सीमावर्ती भागातील कन्नड भाषिक गावे. महाराष्ट्राला हवा आहे बेळगावसह निपाणी आणि कारवार. त्यातून निर्माण झाला आहे कर्नाटक-महाराष्ट्र सीमावाद. गेल्या अनेक वर्षांपासूनच्या या वादाला कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी फोडणी दिल्यामुळे दोन्ही राज्यात सीमावर्ती भागामध्ये संघर्ष सुरू झाला आहे. दोन्ही राज्ये एकमेकांना 'देत नाही... अन् सोडत नाही..' अशी भाषा वापरत असल्यामुळे सीमावादाचा राग पुन्हा एकदा उफाळून आला आहे. त्यातूनच कर्नाटकात महाराष्ट्राच्या आणि महाराष्ट्रात कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांच्या पुतळ्यांना आग लावण्याचा सार्वजनिक कार्यक्रम सुरू झाला आहे. त्याचाच एक भाग शुक्रवारी सोलापुरात पाहण्यास मिळाला.**

## ▪ तिकडे मराठी वाहने फोडली, इकडे कन्नड बसच्या वाहक-चालकांचा सत्कार





या सीमावादावरून पहिल्यांदा कर्नाटकात महाराष्ट्रातील एस.टी.गाड्यांना अडवून परत पाठवण्यात आले. त्याचीच पुनरावृत्ती महाराष्ट्रातही काही ठिकाणी पाहण्यास मिळाली. सोलापुरात मात्र कर्नाटकाच्या एस.टी.गाड्यांना प्रवेश देण्यात आला. त्याचवेळी कर्नाटकात तोडफोड होत असल्यामुळे नुकसान टाळण्यासाठी तीन दिवस सोलापूर आणि अक्कलकोट डेपोतून कर्नाटकात एस.टी. गाड्या गेल्याच नाहीत.

मराठा क्रांती मोर्चाचे आंदोलनात समन्वयक दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, दास शेळके, तुकाराम मस्के, हेमंत पिंगळे, बाबा शेख, शेखर फंड, युवराज शेळके, युवराज वाघमोडे, राजू पाटील, युवराज घाडगे, शिरीष चव्हाण, अक्षय शिंदे, दिनेश जगताप, बजरंग घुले, संजय घाडगे, फारुख शेख, आयान दिना, सलीम शेख, गौस पिरजादे, एजाज शेख, इरफान शेख,मंजुनाथ सिंदगी उपस्थित होते. दुसरीकडे बाळासाहेबांच्या शिवसेनेचे आंदोलन जिल्हाप्रमुख मनीष काळजे, अमोल शिंदे व शहरप्रमुख मनोज शेजवाळ यांच्या नेतृत्वाखाली किशोर चव्हाण, शिवराज विभुते, येशू मद्री, पद्मसिंह शिंदे, ऋषि घोलप सागर शितोळे आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

### शिवाजी चौकात गांधीगिरी

मराठा क्रांती मोर्चा व छत्रपती शिवाजी महाराज मुस्लीम ब्रिगेडच्यावतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कर्नाटक सरकार विरोधात गांधीगिरी पध्दतीने कर्नाटक बसच्या चालक-वाहकाचा सत्कार करून त्यांना पेढे भरवण्यात आले. महाराष्ट्राच्या वाहनावरील हल्ले थांबवले नाहीत तर जशाच तसे उत्तर देण्याचा इशारा यावेळी मराठा क्रांती मोर्चाने दिला आहे.

### गदगमध्ये एकनाथ शिंदेंच्या पुतळ्याचे दहन

कर्नाटकातील गदगमध्ये कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत गुरूवारी जोरदार निदर्शन केली होती. त्यावेळी महाराष्ट्रातून कर्नाटकात गेलेल्या वाहनांवर चढून कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुतळ्याचे भरचौकात दहन करण्यात आले.

### चार हुतात्मा चौकात बोम्मईंच्या पुतळ्याला आग

गदगमधील पुतळा दहनाला प्रत्युत्तर देण्यासाठी सोलापुरात बाळासाहेबाच्या शिवसेनेकडून कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांचा पुतळा जाळण्यात आला. चार हुतात्मा पुतळा चौकात झालेल्या या पुतळादहनावेळी कर्नाटकाने महाराष्ट्र द्वेष न थांबवल्यास कर्नाटकात जाऊन बोम्मईंचा पुतळा जाळण्याचा इशारा देण्यात आला.

# पोलीस हवालदार अप्पा पवार, माशाळकर यांची बडतर्फी रद्द

**▸ सेवेत सामावून घेण्याचा अप्पर मुख्य सचिवांचा आदेश**

✔ **सोलापूर** : पोलीस आयुक्तालयातील हवालदार अप्पा पवार आणि पोलीस कॉन्स्टेबल बळीराम माशाळकर यांना तत्कालीन पोलीस आयुक्त हरिष बैजल यांनी दिलेली सेवा बडतर्फीची शिक्षा बेकायदेशीर ठरवत ती रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा आदेश गृहविभागाचे अप्पर मुख्य सचिव श्याम तागडे यांनी दिला.

त्यानुसार पोलीस आयुक्तांनी या दोन्ही कर्मचाऱ्यांना शुक्रवारी पोलीस सेवेत पुन्हा हजर करून घेतले. सेवानिवृत्तीला काही दिवसच शिल्लक असताना तत्कालीन पोलीस आयुक्त हरिष बैजल यांनी पोलीस मुख्यालयातील हवालदार अप्पा पवार आणि फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील कॉन्स्टेबल बळीराम माशाळकर यांना सेवेतून बडतर्फ केले होते. या शिक्षेविरूध्द पवार आणि माशाळकर यांनी राज्य शासनाकडे अपील दाखल केले होते. त्याची सुनावणी गृहविभागाचे अप्पर मुख्य सचिव श्याम तागडे यांच्यासमोर नुकतीच झाली. सुनावणीदरम्यान दोन्ही बाजू ऐकून घेऊन बैजल यांनी दिलेली बडतर्फीची शिक्षा बेकायदेशीर ठरवण्यात आली.

▪ **बडतर्फीची शिक्षा अन्यायकारक :** पोलीस नियमावलीनुसार पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षा ह्या अनियमित व अन्यायकारक नसाव्यात असे म्हटले आहे. केवळ संशयावरून कोण्याही पुराव्याअभावी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३११(२) (ब) नुसार देण्यात आलेली बडतर्फीची शिक्षा ही अन्यायकारक असल्याचे अप्पर मुख्य सचिवांच्या आदेशात नमूद केले आहे.

▪ **नैसर्गिक न्याय तत्त्वांचा झाला भंग :** पवार आणि माशाळकर यांना बडतर्फ करत असताना प्राथमिक चौकशी सुरू असतानाच विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली असे भासवण्यात आले. शिवाय शिक्षा देताना या कर्मचाऱ्यांना बचावाची कोणतीच संधी बैजल यांनी दिलेली नव्हती. या बाबी सुनावणीदरम्यान स्पष्ट झाल्या. त्यामुळे बडतर्फीची कारवाई करताना नैसर्गिक न्याय तत्त्वांचा भंग केल्याचा ठपका बैजल यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

त्यामुळे पवार आणि माशाळकर यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा आदेश देण्यात आला. या आदेशानुसार हे दोन्ही कर्मचारी शुक्रवारी सायंकाळी शहर पोलीस मुख्यालयात पुन्हा हजर झाले.

# सिद्धेश्वर यात्रेदरम्यान वंदे भारत रेल्वे सुरू करावी

**▸ खा.डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी यांनी संसदेच्या हिवाळी अर्थसंकल्पात केली मागणी**

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर ते मुंबई दरम्यान वंदे भारत ट्रेन चालवण्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तत्पूर्वी २६ जुलै २०२२ रोजी रेल्वेमंत्र्यांनी सोलापूरच्या शिष्टमंडळासमक्ष मुंबई - सोलापूर दरम्यान वंदे भारत ट्रेन सुरू करण्याचे आश्वस्त केले होते. तो त्यांनी पूर्ण केल्याचा सोलापूरच्या जनतेला अत्यंत आनंद आहे.



त्यामुळे ही रेल्वे येणाऱ्या जानेवारी महिन्याच्या ग्रामदैवत सिध्देश्वर यात्रेदरम्यान १२ ते १५ जानेवारी दरम्यान करण्याची मागणी खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांनी केली.

संसदीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांनी वंदे भारत रेल्वेचा विषय उपस्थित केला. सोलापूर ते मुंबई दरम्यान वंदे भारत ट्रेन मार्च २०२३ ला सुरु होणार आहे, अशी माहिती रेल्वे प्रशासनाला प्राप्त झाली आहे. या बाबत रेल्वे मंत्र्यांनी लवकरात लवकर निर्णय घेत येणाऱ्या गड्डा यात्रेत सोलापूरकरांना भेट द्यावी अशी मागणी केली. वंदे भारत रेल्वेच्या घोषणेमुळे समस्त सोलापूरकरांच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, रावसाहेब दानवे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आभार व्यक्त केले. या प्रश्नामध्ये, दरवर्षी सोलापूरात ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरजींच्या उत्सवाच्या शुभ मुहूर्तावर १२ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत सोलापुरात मोठी यात्रा भरते.

ज्यामध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेशसह देशभरातून लाखो भाविक सहभागी होतात. गड्डा यात्रेच्या या शुभमुहूर्तावर रेल्वे प्रशासनाने सोलापूर ते मुंबई दरम्यान रेल्वे सुरू केल्यास सोलापूरकरांचा आनंद द्विगुणित होईल, असे खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांनी म्हटले आहे.



फिफामध्ये धक्कादायक निकाल

## पाच वेळच्या चॅम्पियन ब्राझीलला पराभवाची 'किक'

फिफा विश्वचषक स्पर्धेमध्ये धक्कादायक निकाल लागला आहे. विजेतेपदाचा दावेदार ब्राझीलला उपांत्य पूर्व फेरीच्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. क्रोएशियाने पाच वेळच्या चॅम्पियन ब्राझीलला पेनल्टी शूटआउटमध्ये पराभूत केलेय. या विजयासह क्रोएशियानं उपांत्य फेरीत स्थान पटकावलेय.

# दुचाकीला क्रूझरची धडक; विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू

**घोडा तांडा येथील घटना**

✔ सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील घोडा तांडा येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या दुचाकीला क्रूझर जिपने जोरदार धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना शहराजवळील कुमठे रस्त्यावरील घोडातांडानजिक शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास घडली.विकास लोकू चव्हाण (वय-१९) असे मरण पावलेल्या युवकाचे नाव आहे.



शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास विकास हा आपल्या दुचाकी एचएफ डीलक्स (एमएच.१३.बीएन.१८३७) वरून कुमठे गावातील कॉलेजला जात होता.त्यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या क्रुझर गाडीने त्याला जोरदार धडक दिली.घटनेनंतर क्रूझर गाडी चालक फरार झाला. अपघाताची माहिती समजल्यानंतर विकासच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेऊन आक्रोश केला. घटनेची माहिती मिळताच विजापूर नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी तसेच पोलीस पथक दाखल झाले. नातेवाईकांनी जोपर्यंत कार चालकास अटक करत नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका घेतली होती, त्यावेळी पोलिसांनी समजूत काढून मृतदेह छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. विकास हा अकरावीमध्ये शिक्षण घेत होता. त्याच्या मृत्यूमुळे घोडातांड्यावर शोककळा पसरली आहे.या अपघाताची प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.अधिक तपास फौजदार रफिक शेख, पोलीस नाईक प्रकाश सुरवसे हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



काल जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आलो

कल्याण
789-44-239

मेन बाजार
256-35-168

# रेशन दुकानाचा काळा बाजार पोहचला हिवाळी अधिवेशनात

## ▪ आ.विजयकुमार देशमुख यांनी उपस्थित केला तारांकीत प्रश्न

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरात सर्वाजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून रेशन दुकानातील धान्य काळ्या बाजारात विकणारी टोळी सक्रीय आहे. रेशन दुकानदार आणि ग्राहक यांच्या संगनमताने हा काळ्या बाजाराचा गोरखधंदा चालू आहे. या बाबतच्या अनेक तक्रारी जिल्हापुरवठा आणि शहर अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे दाखल आहेत. मात्र कारवाईच्या नावाने बोंबाबोंब आहे.

सोलापूरातील या काळ्याबाजाराची धग डिसेंबर पासून नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशात पोहचली आहे. शहर उत्तरचे आ. विजयकुमार देशमुख यांनी याबाबतचा तारांकित प्रश्न उपस्थित करत शासनाने चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी करणारा प्रश्न उपस्थित केला आहे. सोलापूर शहरात ३१४ जिल्हामध्ये १५५४ रेशन दुकानदार आहेत. या दुकानदारांच्या माध्यमातून गोर गरीब जनतेला गव्हू आणि तांदुळ मोफत दिला जातो सोलापूर शहरात अंत्योदय योजनेचे ६१५४ कार्ड असून २४७२६ लाभार्थी आहेत तर अन्नसुरक्षा योजनेचे ११००१८ कार्डधारक आहेत ४९५७९० लाभार्थी आहेत. सोलापूर ग्रामीण भागात अंत्योदय योजनेचे ५४३९८ कुटुंब असून २५५८५९लाभार्थी आहेत तर अन्नसुरक्षा योजनेचे ३५१७२४ कुटुंब असून १७०२६८० लाभार्थी आहेत. यांना रेशन दुकानदारांच्या माध्यमातून लाखो क्विंटल धान्य वितरण केले जाते. मात्र गोर गरिबांना दिल्या जाणाऱ्या धान्यावर डाला मारणारी टोळी अनेक दिवसा पासून सक्रीय आहे. घरो घेरी शिक्षाच्या माध्यमातून हे धान्य विकत घेऊन या धान्याचा काळा बाजार केला जातो यासाठी दलाल सक्रीय आहेत यांचे शहरा अनेक ठिकाणी मोठे गोडाऊन आहे. तर काही रेशन दुकानदार लाभार्थ्यांना धान्य नदेता काळाबाजार करणाऱ्या दलालांना थेट विकत असतात. दुकानदार ग्राहक आणि काळाबाजर करणाऱ्या दलाल यांची यासाठी मिलीभगत आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी पुरवठा विभाग आणि अन्न धान्य वितरण अधिकारी यांच्याकडे आहेत. मात्र करवाई केली जात नाही आता आ. देशमुख यांनी हिवाळी आधिवेशानात काळ्या बाजाराची धग पोहचल्याने काळ्या बाजार करणारे दुकानदार, ग्राहक आणि दलाल यांना हुडहुडी भरली आहे. देशमुख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर गोळा करण्याची धावपळ सध्या जिल्हाप्रशासनामध्ये धावपळ चालू आहे.



### काळा बाजार करणाऱ्याचे धाबे दणाणले

आ. प्रणिती शिंदे यांनी तक्रार अशीच तक्रार केल्यानंतर भरारी पथकांच्या माध्यमातून रेशनदुकानाची तपासणी केली होती. यावेळी काळा बाजार करणाऱ्याचे धाबे दणाणले होते. मात्र कारवाईच्या अद्याप झाली नाही सर्व काही अलबेल चालू असल्याचे चित्र पुरवठा विभागात आहे. आता तर हा विषय हिवाळी आधिवेशनात गाजणार आहे.

काळा बाजार करणाऱ्या दुकानदारांना रेशनदुकानदार संघटना पाठिशी घालणार नाही काळ्या बाजार करणाऱ्यांवर योग्य कारवाई झाली पाहिजे असे रेशन दुकानदार संघटनेचे मत आहे. संघटना प्रशासनाच्या पाठीशी आहे

**- नितीन पेंटर**

(जिल्हा समन्वयक रेशन दुकानदार संघटना)

CMYK

# खुंटी बळकट

केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने गुजरातमध्ये ऐतिहासिक यश मिळवून २०२४ च्या लोकसभा निवडणुकींची आपली राजकीय खुंटी अजून मजबूत केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री अमित शहा हे दोघेही गुजरातचे सुपुत्र. त्यांच्यासाठी ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची होती. गुजरातची विधानसभा नुसती जिंकलेली नाही तर साधारण १५९ जागा जिंकून देशाच्या राजकीय इतिहासात नवा विक्रम केला.त्याची दखल आता भाजपवर नियंत्रण असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला घ्यावीच लागेल. गेली २७ वर्षे सत्तेत असूनही लोकांचा भरभरून विश्वास संपादन करण्याची किमया भाजपने साधली. दोन तृतीयांश बहुमत प्राप्त करून भाजपने गुजरातमधील सारे विक्रम मोडीत काढले. मोदी यांचा करिश्मा भाजपला फायदेशीर ठरला. कोरोना परिस्थिती हाताळण्यात गुजरात सरकारला अपयश आले होते. तसेच सरकारबद्दल लोकांच्या मनात नाराजी होती. २०१७चा अनुभव लक्षात घेऊन भाजपने मुख्यमंत्री बदलले आणि साऱ्या जुन्या मंत्र्यांना घरी बसवून नवीन चेहऱ्यांना संधी दिली. भाजपकडून नेहमी विकासाच्या 'गुजरात मॉडेल'चा उल्लेख केला जातो. या यशानंतर २०२४च्या लोकसभा निवडणुकीसाठी आत्तापासूनच प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू करण्यावर भाजप भर देईल.परीक्षेला बसणारा विद्यार्थी चांगल्या मार्कांने उत्तीर्ण होण्यासाठी पहिल्यापासूनच तयारी करतो. परीक्षेच्या तोंडावर जो पुस्तक उघडतो, तो तोंडावरच आपटतो.भाजपचे अगदी सतेच आहे. दूरगामी विचार करून भाजप नेते पुढच्या निवडणुकीची तयारी अगोदरपासूनच करतात.भाजपच्या यशाचे हे गमक सांगता येईल.



गुजरातच्या यशानंतर महाराष्ट्रातील काही वाचाळवीर सोडले तर देशभरातील एकाही भाजपेतर पक्षांमधील एकाही नेत्याने तोंड उघडलेले नाही. कारण विरोधकांनी तोंडात बोटे घालून बसावेत, असेच हे गुजरातचे यश आहे. गुजरातमध्ये काँग्रेसच्या विजयी जागांचा विक्रम भाजपने मोडला. आता लोकसभेत काँग्रेसचा ४०४ जागांचा विक्रम मोडण्याचे भाजपचे २०२४च्या निवडणुकीत लक्ष्य असणार, यात शंका नाही. यश मिळो न मिळो पण भाजपचे प्रयत्न असणार. वास्तविक १० वर्षे सतत सत्तेत असल्यावर राजकीय पक्षांना लोकांच्या नाराजीचा (ॲन्टी इन्कबन्सी) सामना करावा लागतो. लोकांच्या साऱ्या अपेक्षा पूर्ण करता येत नाहीत. त्यातून सत्ताधारी पक्षाच्या विरोधात नाराजी वाढत जाते. पण मोदी यांचा करिश्मा पक्षाला उपयोगी पडला. गुजराती अस्मिता हा मुद्दा होताच. गुजराती समाजाचा देशाचा पंतप्रधान आहे तर आपल्या राज्यात पंतप्रधानांना पाठिंबा द्यावा ही भावना होती व भाजपने त्यावर भर दिला होता. २०१७मध्ये पटेल समाजाची नाराजी होती. या समाजाची नाराजी दूर करण्यावर भर देण्यात आला. गेल्या वर्षी भाजपने विजय रुपाणी यांची मुख्यमंत्रिपदावरून उचलबांगडी केली. त्यांच्याऐवजी भूपेंद्र पटेल या पाटीदार समाजाच्या नेत्याकडे मुख्यमंत्रिपद सोपविण्यात आले. याचाही भाजपला फायदा झाला. २०१७च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला पटेल समाजाच्या नाराजीचा मोठा फटका बसला होता. विधानसभा निवडणुकीपूर्वी पटेल समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. पाटीदार पटेल समाजात भाजपबद्दल नाराजी होती. याचा फटका पटेलबहुल भागांत भाजपला बसला होता. सौराष्ट्रात काँग्रेसने अधिक जागा जिंकल्या होत्या. यंदा मात्र पटेल समाजाच्या नाराजीचा भाजपला फटका बसलेला नाही. गेल्या वर्षी नेतृत्वबदल करताना भाजपने भूपेंद्र पटेल या पाटीदार समाजाच्या नेत्याकडे मुख्यमंत्रिपद सोपविले. तसेच निवडणुकीतील विजयानंतर पटेल यांच्याकडेच मुख्यमंत्रिपद कायम ठेवण्यात येईल, असे भाजपने जाहीर केले. पटेल समाजाची नाराजी दूर करण्याकरिता ४०पेक्षा अधिक मतदारसंघांत पटेल समाजाला भाजपने उमेदवारी दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच आर्थिकदृष्ट्या मागास समाजाला १० टक्के आरक्षण देण्याची १०३ वी घटना दुरुस्ती वैध ठरविली होती. भाजप सरकारच्या या १० टक्के आरक्षणाचा पटेल समाजाला फायदा होणार आहे. या यशाच्या बळावरच भाजप आता पुढील रणनीती ठरवेल.गुजरातनंतर आगामी काळात म्हणजेच लोकसभा निवडणुकीपूर्वी मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, छत्तीसगड, तेलंगणा आणि त्रिपुरा या राज्यांची विधानसभा निवडणूक होणार आहे. छत्तीसगड, राजस्थान व मध्यप्रदेश ही तीन राज्ये उत्तर भारतात तर कर्नाटक आणि तेलंगणा ही दोन राज्ये द. भारतातील या पाच ठिकाणी भाजपचे प्राबल्य आहे. भाजपचे दक्षिण मिशन बऱ्याच दिवसांपासून सुरू आहे. ह्या राज्यांच्या निवडणुका म्हणजे लोकसभेची सेमीफायनल मानली जात आहे. गुजरातच्या यशामुळे भाजपची खुंटी मजबूत झाली आहे. आता विरोधकांना ती हलवता येईल का? हे येत्या काळात पहायला मिळेल.

## राजकीय

# 'डबल इंजिन'ला ब्रेक!

**गुजरात आणि हिमाचल प्रदेश यांपैकी केवळ गुजरात राज्यातच 'डबल इंजिन'चे सरकार धावणार आहे. म्हणजे केंद्र आणि राज्य दोन्ही जागी एकाच सरकारची सत्ता. 'डबल इंजिन सरकार' हे ३ शब्द सुपरिचित झाले आहेत. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत गुजरातच्या मतदारांनी भाजपला ऐतिहासिक यश मिळवून दिले. यामागे आपल्या राज्याचा विकास 'बुलेट ट्रेन'च्या वेगाने होईल, अशी आशा येथील जनतेला असल्याचे सुस्पष्ट होते. मात्र, भरधाव असणाऱ्या इंजिन आणि ट्रेनच्या वेगात काँग्रेस आणि आप नावाचे सिग्नल लागल्याने म्हणावा तसा सुसाट वेग गाठता आला नाही. हे हिमाचल आणि दिल्ली मनपाचे निकाल सांगतात.**

---

गेल्या ४० वर्षांपासून हिमाचलमध्ये प्रति ५ वर्षांनी सत्तांतर होत आहे. त्यामुळे यंदा आपणच सत्तेवर येणार याची निश्चिती असल्याने काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी हिमाचलमध्ये प्रचारासाठी फिरकले नाहीत. आता हेच राहुल गांधी सांगत आहेत 'येथील जनतेला दिलेली आश्वासने आम्ही लवकरात लवकर पूर्ण करू.' अर्थातच यावर विश्वास ठेवणे धाडसाचे ठरेल. कारण एका राज्याच्या विधानसभेची निवडणुक असूनही गांधी पुत्र, माता यांना तिथे जाण्यासाठी रस दाखवलेला नाही. असे का? हे जाणून घेण्यासाठी हिमाचली जनतेलाही रस वाटला नाही. आणि जे आपल्या अडचणी जाणून घेण्यासाठी आले नाहीत त्यांच्या हाती सत्तेच्या किल्ल्या सुपूर्द केल्या, हे विचित्र आहे. प्रस्थापितांना धडा शिकवायचा म्हणून त्यांच्या वरील नाराजीचा राग म्हणून त्यांच्या विरोधी पक्षास निवडून आणले जाणे अतार्किक वाटते. 'जो पक्ष सत्तेत असेल त्याच्याकडून कामे करून घेतली पाहिजे. तसे होत नसेल तर त्यांच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोचले पाहिजे. त्यासाठी सोशल मीडियाचा योग्यप्रकारे, योग्य भाषेत उपयोग केला पाहिजे', हे सूत्र येथीलच नव्हे तर सर्वत्रच्या लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. ज्या लोकप्रतिनिधींत कामचुकारपणा आहे. त्याच्याकडून कामे करून घेण्यासाठी वरील सूत्राचा अवलंब अनिवार्य ठरतो. कारण नाक दाबल्याविना तोंड उघडत नसते. हे केवळ माहीत असून उपयोग नाही तर त्याप्रमाणे केले पाहिजे.

आज हे उद्या ते. असे उत्तर प्रदेश राज्यातही चालू होते. मात्र तेथील मतदारांनी पुन्हा विद्यमान सरकारला संधी दिली. असे होताना विद्यमान सरकारला अनेक जागांवर पडझड सहन करावी लागली. हे विशेष. लोकप्रतिनिधी कामे करत नाहीत तर त्याविषयी जनतेत केवळ नाराजी असून उपयोगी नाही. तर नागरिक म्हणून मी किती जागरुक आहे ? आणि तसे वागत आहे. याकडेही पाहिले जावे. केवळ 'ईव्हीएम'वरील बटन दाबून होणारे परिवर्तन उपयोगी नाही. लोकप्रतिनिधींच्या कामचुकार वृत्तीत पालट घडवून आणण्यासाठी प्रयत्न व्हावे. लोकप्रतिनिधी कामचुकार बनण्यास लोकही तितकीच कारणीभूत असतात. निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीकडून कामे करून घेण्यात दिरंगाई झाल्यावर ५ वर्षे सत्तांतर होण्यासाठी प्रतीक्षा करणे हास्यास्पद नाही का?

प्रति ५ वर्षांनी सत्तांतर घडवत राहिलो तर मतदारांना आपसूकच गृहीत धरले जाणार. याचा वस्तूनिष्ठ पाठ हिमाचल प्रदेश निवडणुकीकडे गांधी पुत्र आणि माता यांची पाठ फिरवण्यातून लक्षात येतो. जे राहुल गांधी महाराष्ट्रातील भारत जोडो यात्रा संपल्यावर २ दिवस ती यात्रा थांबवून गुजरात राज्याच्या निवडणुक रणधुमाळीत सहभागी होतात तेच हिमाचलमध्ये सहभागी झाले



नाहीत.

मतदार गुजरातचा असो वा हिमाचलचा दोघांकडे पाहण्याची दृष्टी समान असली पाहिजे होती. ती असमान असण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. केवळ पंतप्रधान मोदी यांना विरोधास विरोध म्हणून कुठेतरी प्रचारात सहभागी होण्याला अर्थ नाही.

प्रचारात सहभागी न होताही हिमाचल प्रदेशच्या राजकीय परंपरेप्रमाणे सत्तांतर होत सत्ता आपल्यापर्यंत आली. असे तेथील नवोदित सत्ताधारी मंडळींना वाटत असले, तरी यापुढे किती वेगाने विकास कामे होतात अथवा जनतेच्या अडचणींचा ढीग कमी होण्यास कसे झटले जाते? याकडे तेथील जनतेने डोळसपणे पाहावे. 'आमचे केंद्रात सरकार आहे. पण राज्यात नाही. त्यामुळे आम्हाला जे निर्णय घ्यायचे होते ते आता घेता येत नाहीत, काँग्रेस सरकार केंद्राच्या योजना राबवत नाहीत वगैरे त्याच त्याच गोष्टी लोकांना ऐकाव्या लागतील. जनतेसमोर हे बोलून आता काय उपयोग ? या सर्व गोष्टी पराभव झाल्यावर का आठवतात? सत्तेत असताना पक्षातील अंतर्गत कलहात वेळ वाया गेला. राजकीय दृष्टीने विचार करता या राज्यातील मातब्बर नेते राष्ट्रीय पातळीवर असूनही भाजपला सत्ता राखता आली नाही. ते नेते म्हणजे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर. जे गुजरातच्या जनतेला मिळते ते आम्हाला का मिळत नाही ? असे प्रश्न हिमाचली जनतेच्या मनात घर करून आहेत का? याचा वेध भाजपला घ्यावा लागेल.

दिल्ली मनपातील १५ वर्षांपासून असलेली सत्ता आणि हिमाचल प्रदेश येथील सत्ता भाजपने गमावली. गुजरात निवडणुकीच्या आंनदात हे दोन मिठाचे खडे पडले. म्हणजे भाजपचे यश म्हणावे तसे घवघवीत नाही. आपने गुजरातमध्ये जोरदार प्रचार केला होता. भले ते आज अपयशी ठरले आहेत. पण ते उद्याकडून अपेक्षा ठेवून आहेत. राजधानीत मनपा आणि राज्य स्तरावर आता आपचेच सरकार आहे. हे भाजपला नक्कीच अस्वस्थ करणारे आहे. केवळ हायटेक प्रचार करून चालत नाही तर जनतेच्या मनाचा अचूक वेध घ्यावा लागतो. त्यात भाजप अजूनही पारंगत नाही. हे आपने त्यांना आरसा दाखवतात तसे दाखवले आहे.


**- जयेश राणे, मुंबई.**

## टुडेज ब्लॉग

# जीवन खरंच सुंदर आहे!

आयुष्य सुंदर आहे! ते जेंव्हा आनंदाने बागडत असेल, जगणे माझे आहे असे वाटेल. हे जीवन अनेकदा नकोसे होते. दु:खाचे, अपमानाचे कठीण प्रसंग जेंव्हा येतात तेंव्हा हेच आयुष्य संपावे इथंवर आपले विचार आणि परिस्थिती आपल्याला नेते. अशा प्रसंगात अनेक आशावादी घटना सोबत घडतात आणि पिचलेल्या या जीवनाला धुमारे फुटू लागतात. जगण्याच्या धावपळीत कधी असे सखे भेटतात की पुन्हा आयुष्याने, जगण्याने भरारी घ्यावी. कधी साध्या सरळ घटना नवे आयाम देत राहतात आपल्या जगण्याला. त्या घटनामधील सहभाग तर आणखी सुखावून जातो. अन्न, पाणी, निवारा या मूलभूत गरजा प्रत्येक सजीवाच्या असतातच. त्या पूर्ण झाल्या की आणखी एक गरज असते ती प्रत्येक जीवन त्याच्या सर्व शक्यतांसह उमलून, फुलून यावे यासाठीची वातावरण निर्मिती असणे! तो प्रत्येक सजीवाचा अधिकार आहे.

या दिवसांमध्ये वि थोडी शांतच असते तेंव्हा बाहेर डोकावण्याला अनेकदा वेळ मिळतो. कालपासून एक साधारण दोन महिन्यांचे एक कुत्र्याचे तांबडे पांढरे पिलू दोन्ही बाजूच्या रस्त्यावर, चौकात आणि हॉस्पिटलच्या समोरच्या झाडांच्या आसपास भटकत होते. संपूर्ण त्वचा हाडांच्या सापळ्याला चिकटलेली, पोट खपाळी गेलेले, डोळ्यात एक प्रकारचा अविश्वासाचा भाव, गळ्यात वळलेल्या चिंध्यांची दोरी बांधलेली. त्या दोरीमुळे आधी वाटले हे कुणीतरी पाळलेले पिलू असेल परंतु ते कालपासून कुठेच गेले नाही. इथेच चौकात फिरत होते. बहुतेक कालपासून उपाशीच होते. त्याला काही खायला द्यावे या हेतूने आम्ही त्याला यु... यु... करून आवाज दिला की ते जास्त वेगाने लांब पळू लागले. त्याच्या नजरेतला अविश्वास आणि भीती काळजाला कापत होती. मग आम्ही जास्त निर्धाराने त्याला खायला घालायचा चंगच बांधला. त्याला जेंव्हा भाकरी दाखवून बोलावू लागलो तेंव्हा मात्र ते लांब उभे राहून आम्हाला बघू लागले. त्याला खायला टाकून आम्ही बाजूला गेलो आणि त्याने ती भाकरी उचलून नेऊन बाजूला जाऊन खाल्ली. गटारीचे पाणी पिऊन समोरच्या बंद डेअरी समोर जाऊन झोपले. रस्त्याने दुसरी कुत्री आली की हे पिल्लू भिऊन बाजूला जाऊन बसे. त्याच्यावर इतर प्राणी आणि माणसे यांच्याबद्दलची भीती, अविश्वास त्याच्या देहबोलीतून स्पष्ट दिसत होता. शेवटी त्याचा विश्वास जिंकायला आम्ही यशस्वी ठरलो आणि हॉस्पिटल बंद करायच्या वेळी ते दारात येऊन शांत पहुडले. जवळून पाहताच ते अधिकच कृश दिसत होते. काही



दिवसांपासून बहुतेक ते अर्धपोटी असावे. कुणीतरी पाळलेले पिलू रस्त्यावर सोडले होते. बहुतेक त्या माणसांकडून त्याची छळवणूक पण झाली असावी म्हणून ते माणसांपासून लांब पळत होते. एक केविलवाणा जीव रस्त्यात भीतीने, उपाशीपोटी अन्न शोधात भटकत होता. लवकरच आई वेगळा झालेला आईच्या कुशीची उब तर शोधत नसेल?

रात्री हळूच दूध चपातीचा काला दाराबाहेर सरकवला. आधी भीतीने ते पिलू बाजूला झाले पण नंतर खाणे आहे पाहिल्यावर त्या दूध चपातीवर तुटून पडले. अधाशीपणे त्याने ते सारे संपवले. आणि बाजूच्या पोत्यावर जाऊन ते पहुडले. आम्ही ते पोते त्यासाठीच कोपऱ्यात टाकून ठेवले होते. मीही समाधानाने झोपी गेले. दुसऱ्या दिवशी मात्र आमची वाट बघत ते दारातच बसून होते. सकाळी पुन्हा दुध काला दिला. पोटभर खाऊन ते इकडे तिकडे हुंदडत राहिले. आम्ही कुणीच त्याला इजा पोहचवणार नाही याची खात्री त्याला दुपारपर्यंत पटली आणि ते आमच्या जवळ फिरू लागले, बाहेर गेल्यावर पायात घुटमळू लागले. जरी कृश होते तरी अत्यंत देखणे काजळ भरल्यासारखे डोळे, मोहक चेहरा त्याला जवळ घ्यायला भाग पाडत होता. शेवटी आम्ही जवळ घेऊन त्याच्या मानेचा तो दोर काढला आणि पाहिले तर ती होती, तो नाही! तेंव्हाच लक्षात आले त्या दोरामागचे कारण. कुणीतरी कुत्रे म्हणून त्याला पाळले आणि ती 'ती' आहे हे कळल्यावर 'ति'ला रस्त्यावर सोडले. या अशा प्राण्यांचे आयुष्य खूप भयानक असते. कारण आधी ते पाळीव असतात तेंव्हा त्यांना अन्नासाठी झगडावे लागत नाही आणि बाहेरच्या इतर भटक्या कुत्र्यांसारखे माणसे आणि भटक्या प्राण्यांच्या हिंसेलाही सामोरे जावे लागत नाही. मग अन्न शोधणे आणि प्रतिकार करणे या दोन्ही गोष्टी या प्राण्यांना जमत नाहीत. आधी पाळलेली आणि नंतर रस्त्यावर सोडलेले हे प्राणी जगण्यासाठीचे झगडणे न शिकल्यामुळे रस्त्यावर मरून पडतात. त्यांची सगळ्यात मोठी वेदना असते त्याच्या मालकाने केलेला विश्वासघात! आणि तेच त्यांच्या मृत्यूचेही कारण असते. म्हणून सो कॉल्ड प्राणी-प्रेमींनी असे करू नये. तुमच्या मौजेसाठी, उपयोगासाठी एखाद्या मुक्या जीवासोबत खेळू नये.

दुसऱ्या दिवसापासून मात्र आमचा हा नवा मित्र चांगलाच मोकळा वागू लागला. आल्यावर पायात घोटाळणे, मागे मागे फिरणे, लांब जाऊन शी शु उरकणे, हॉस्पिटलच्या आवारात इतर प्राण्यांना येऊ न देणे. एकूणच त्याच्या देहबोलीत झालेला हा आमूलाग्र बदल आम्हांला विशेष सुखावून गेला. शेपूट खाली घेऊन भिऊन इकडे तिकडे फिरणारे, अविश्वासाने जवळ न येणारे हे पिल्लू आज विश्वासाने, शेपूट वर फडकावत सगळ्या आवारात फिरत होते जसे की हे सर्व त्याच्यासाठीच बनले आहे! जीवन आता खरंच सुंदर आहे!

**- गीतांजली शेलार.**

## बोधकथा

# त्यागाचे महत्व



फार वर्षापूर्वी एक स्वाभिमानी राजा होऊन गेला. त्याचे राज्य मोठे होते आणि अपार संपत्तीने खजिना भरलेला होता. त्याचे महाल सोन्यापासून बनलेले होते. नोकरचाकरांची रेलचेल होती. मात्र त्याचे सल्लागार त्याच्या अहंकाराला प्रोत्साहन देत होते. एकदा त्याच्या दरबारात एक तेज:पुंज साधू आला.

राजाला पाहूनच त्याने ओळखले की राजाला फार गर्व चढला आहे. राजाने मोठ्या तोऱ्यात विचारले,''तुला काय पाहिजे?'' साधू म्हणाला,'' राजन, मला तुझ्याकडून काहीच नको आहे. उलट मीच तुला काहीतरी देण्यास आलो आहे.'' राजाचा अहंकार दुखावला व राजा मोठ्याने ओरडला, ''लहान तोंडी मोठा घास घेतोस. लाज वाटते का नाही. तुझ्याजवळ फुटकी कवडी नाही अन तू मला काय देणार?'' साधू मंद स्मित करत म्हणाला,''राजन, त्यागाशिवाय भोगाला चव येत नाही. वैभवात जेव्हा त्याग समाविष्ट होते तेव्हा तो वंदनीय आणि प्रशंसनीय ठरतो. त्याग येताच अहंकार दूर होतो. आसक्ती दूर होते आणि मन परमात्म्याकडे पोहोचण्यासाठी तयार होते.'' फकिराच्या राजा खजील आला आणि त्याचे डोळे उघडले. त्याने गर्वाचा त्याग केला. **तात्पर्य :- त्यागाने अहंकाराचा नाश होतो. अहंकार हा मनुष्याचे नुकसान करतो.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ४



हा एक जीवनक्रम आहे. जे या क्रमाने जीवन जगतात, त्यांना सुख लाभते आणि जे हा क्रम बिघडवून जीवन जगतात, त्यांना दु:खांना सामोरे जावे लागते. प्रजोत्पत्तीपुरता अपवाद करुन जो गृहस्थ ब्रह्मचर्य पाळतो, तो ब्रह्मचारीच होय. इंद्रियांचा संयम केल्याशिवाय चित्त एकाग्र होत नाही आणि चित्त एकाग्र होत नसेल तर ब्रह्मज्ञान प्राप्त होत नाही. म्हणून ज्याला ब्रह्मज्ञानप्राप्तीची इच्छा असेल त्याने आपल्या आश्रमानुसार ब्रह्मचर्याचे पालन केले पाहिजे.

यानंतरचा धर्म आहे 'दया'. या प्रपंचात अनेक दु:खी, कष्टी जीव राहत असतात. एखाद्याचे दु:ख पाहून जर तुमचे हृदय करुणेने पाझरत नसेल तर तुम्हांला 'माणूस' म्हणता येणार नाही. दु:खी माणसाविषयी आपल्या मनात सहवेदना, सहानुभूती निर्माण व्हायला हवी. त्यापेक्षाही 'समानाभूती' निर्माण हवी. दु:खी माणसांजवळ चार सांत्वनपर शब्द बोलणे याला 'सहानुभूती' म्हणतात तर दु:ख भोगणाऱ्या माणसाला पाहून तेवढे दु:ख आपल्या अंतर्यामी उत्पन्न होणे ही 'समानाभूती' होय. दु:खी माणसाला मदत करण्याची इच्छा म्हणजे दया. तुमच्या हृदयात दया नसेल तर तुम्हांला ब्रह्मज्ञान कदापी प्राप्त होणार नाही. कारण सर्व प्राणिमात्रात आत्मदर्शन घेणे आणि ही भावना दृढ होणे हीच तर ब्रह्मज्ञानाची एक पायरी आहे. दया हे सर्व धर्माचे मूळ आहे. तुमच्या मनात दया नसेल तर तुम्ही धार्मिक होणार नाही.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# मुसंडी कशी मारली?

गुजरातमध्ये विधानसभेचे निकाल नुकतेच लागले. या निवडणुकीत भाजपाने १८२ जागा असलेल्या विधानसभेत तब्बल १५६ जागा मिळवून अभूतपूर्व यश संपादन केले. काँग्रेस पक्षाला केवळ १७ जागा मिळाल्या. काँग्रेस पक्षाची अशी स्थिती झाली आहे की त्या पक्षाला १० टक्के जागा मिळाल्या नसल्याने विरोधी पक्ष नेत्याचे सुद्धा स्थान मिळू शकणार नाही. या निवडणुकीत सतत २७ वर्षे भाजपने सत्तेत राहण्याच्या पश्चिम बंगालमधील कम्युनिस्ट पक्षाच्या विक्रमाची बरोबरी केली. हे यश मिळवण्यात भाजपने मागील निवडणुकांपासूनच तयारी सुरू केली होती. २०१७ च्या विधानसभेत भाजपाला केवळ ९९ जागा मिळावत बहुमत मिळवावे लागले होते. त्यावेळी काँग्रेसने ७७ जागा मिळवत भाजपाला नाकी दम आणले होते. या निवडणुकीत भाजपने विक्रमी विजय कसा मिळविला याची काही कारणे व केलेली कारणमीमांसा.

**मोदींचे वलय** : पंतप्रधान मोदी हे आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय नेते आहेत. २०१४पासून लोकसभा जिंकत त्यांनी आपला आलेख उंच केला आहे. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात गुजरात येथूनच झाली आहे. त्यामुळे साहजिकच लोकांना त्यांच्या विषयी प्रेम आहे. त्याची परिणीती मतात होताना दिसत आहे. मोदींनी येथे तीसपेक्षा जास्त सभा घेतल्या तसेच अहमदाबाद येथे मोठा रोड शो केला. याचे भरभरून फळ त्यांना मतदारांनी दिले.

**निवडणूक यंत्रणा व पक्षबांधणी :** प्रत्येक बूथवर कार्यकर्ते तसेच निवडणूक व्यवस्थापन खूपच चांगले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक मतदार संघात प्रचाराचे सुनियंत्रित जाळे विणले होते. प्रचार यंत्रणेवर भाजपा अध्यक्ष नड्डा व अमित शहा यांचे वैयक्तिक लक्ष होते. याउलट काँग्रेस पक्षाची परिस्थिती होती. राहुल गांधींच्या केवळ दोनच सभा झाल्या. शिवाय काँग्रेस पक्षाला गुजरातेत प्रभावी नेतृत्व सुद्धा नव्हते. त्याच्या प्रचारात विस्कळीतपणा होता. त्याचा फायदा भाजपाने उचलला.

**तिकीट वाटप :** निवडणुकीतील तिकिटाचे वाटप अतिशय पद्धतशीरपणे केलेले होते. अनेक दिग्गजांची तिकिटे कापली नवीन चेहऱ्याला अधिक वाव दिला. अनेक मंत्र्यांना वगळले मोरबी येथील दुर्घटनेत अनेक जणांचा जीव गेला. तेथील आमदाराला तिकीट दिले नाही तर ज्यांनी अपघातात मदत केली अशा ना तिकीट दिले, त्याचा फायदा तेथे पक्षाचा उमेदवार निवडून येण्यात झाला.

**गुजराथी अस्मितेला हात :** भाजपच्या नेत्यांनी सर्वच सभांमध्ये गुजरातच्या अस्मितेवर भर दिला. गुजरातमध्ये उद्योग व व्यवसाय कसे उभे राहतील हे पाहिले.

**आपचा प्रचार** : मोदींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी शेवटच्या टप्प्यात आप पक्षावर प्रचार व टीका करण्याचे टाळले. त्याचा फायदा त्यांची लढत काँग्रेस पक्षाशी झाली व त्यांनी त्यांची मते खाल्ली साहजिकच काँग्रेस पक्षाला कमी जागा मिळाल्या.



**निवडणूक प्रचारात अनेक केंद्रीयमंत्री व आमदारांचा समावेश :** निवडणूक प्रचारात अनेक केंद्रीय मंत्री व आमदार सहभागी झाले होते. काही आमदारांच्याकडे ठरावीक मतदार संघ दिले होते. त्याचा फायदा मतात झाला महाराष्ट्राचे अनेक नेते प्रचारात होते. देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय पद्धतशीर प्रचार दक्षिण गुजरातमध्ये केला.

**सर्वच मतदार संघात लक्ष दिले :** सौराष्ट्रासारख्या प्रदेशात काँग्रेस पक्षाचा जोर नेहमीच राहिला आहे. तेथे पद्धतशीर प्रचार केला गेला. याशिवाय जेथे आदिवासी व मुस्लीम मतदार जास्त आहेत तेथेही जास्त; उमेदवार निवडून आणले तसेच एका ख्रिस्ती उमेदवाराला सुदाह तिकीट देऊन निवडून आणले यामागे योग्य ते नियोजन होते.

**विकासावर लक्ष दिले :** गुजरातमध्ये विकास घडविण्यावर लक्ष दिले. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार असल्याने तेथे विकास प्रकल्प राबविण्यात व समन्वय साधण्यात चांगले यश मिळाले.

**भाजपा कार्यकर्त्यांची मेहनत :** या निवडणुकीच्या अगोदर अनेक भाजप कार्यकर्ते जिवापाड राबत होते. त्याचाही परिणाम निकालावर झाला.

**इतर पक्षातून अनेक दिग्गज सामील :** गेल्या अनेक दिवसात अंक आमदारांनी काँग्रेस पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश घेतला. तसेच पाटीदार समाजाचा नेता हार्दिक पटेल यास भाजपामध्ये प्रवेश देऊन त्यास आमदारकीचे तिकीट दिले. याचा फायदा पाटीदार समाजाची मते भाजपाकडे वळविण्यात झाला.

**प्रचारात काँग्रेस पक्षाची अप्रत्यक्ष मदत :** गुजरातच्या प्रचारात काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खर्गे यांनी मोदींना रावणाची उपमा दिली, त्याचा फायदा भाजपाने प्रचारात करून घेतला. भाजपने या अगोदर सर्वाधिक १२७ जागा २००२ मध्ये जिंकल्या होत्या. भाजपा १९९५ पासून सत्तेत आहे. २०१७ च्या निवडणुकीत भाजपाला कसे बसे बहुमत मिळाले होते. त्यावेळी केवळ ९९ जागा मिळाल्या होत्या. त्याची कसर आता भरून काढली व विजयाची व विक्रमाची घोडदौड कायम राखली. **- शांताराम वाघ, पुणे.**

## जनमानस

# घरपोच वस्तू मागवताना...!

पाण्याच्या बाटलीपासून सोन्याच्या दागिन्यांपर्यंत सर्वच वस्तू, खाद्यपदार्थ सध्या ऑनलाईन पद्धतीने आणि तेही सवलतीच्या दरात घरपोच मागवता येत असल्याने शहरासारख्या ठिकाणी लोकांचा कल त्याकडे अधिक दिसून येतो.

परिणामी हे साहित्य घरपोच डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्याही सध्या तेजीत आहेत. स्वतःची दुचाकी असल्यास या डिलिव्हरी कंपन्यांमध्ये हमखास नोकरी मिळवता येते. कोणत्याही वस्तूची घरपोच डिलिव्हरी करणाऱ्या या कर्मचाऱ्यांचा वस्तू मागवणाऱ्या ग्राहकांच्या घराशी थेट संपर्क येत असतो. एरव्ही अनोळखी क्रमांकावरून आलेले फोनही न उचलणारे आपण एका अनोळखी डिलीव्हरी बॉयला आपल्या दारापर्यंत बोलावतो. ऑनलाईन ग्रोसरी आणि साहित्य पुरवणाऱ्या एका कंपनीच्या शहजाद शेख नामक डिलिव्हरी बॉयने मुंबईतील खार येथील एका ग्राहक युवतीचा विनयभंग केल्याची घटना नुकतीच घडली. डिलिव्हरी बॉयकडून विनयभंग, बलात्कार, चोरी, मारहाण केली गेल्याच्या अनेक घटना यापूर्वीही घडल्या आहेत. तरीही आपण त्यातून अद्याप बोध घेतलेला नाही. ज्या वस्तू आपण सहज घरी घेऊन जाऊ शकतो, त्या वस्तू थेट दारापर्यंत मागवण्याची आवश्यकता आहे का? इमारतीच्या खाली किंवा जवळच्या रस्त्यावर जाऊन त्या घेण्याचा त्रास आपण का घेत नाही? वस्तू घरपोच मागवताना आपण सोबत स्वतःची असुरक्षितताही मागवत आहोत, हे आपल्या केव्हा लक्षात येणार?

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.**

# मनाचा मोठेपणा दाखवावा

पूर्वीच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया संयमित असत व राजकारणापलिकडे जाऊन मनाचा मोठेपणा दिसत असे. आता यातील कोणत्या गोष्टी दिसतात? राजकारण इतक्या खालच्या पातळीवर पूर्वी कधीच गेले नव्हते. कोणीतरी मनाचा मोठेपणा दाखवून चांगले वातावरण निर्माण करावे ही अपेक्षा!!

**- प्र. मु. काळे, नाशिक.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



गुरव समाजाच्या अधिवेशनासाठी सोलापुरात आलेले बुलढाण्याचे माजी आ. माजी आमदार विजयाराजे शिंदे यांनी दै. सुराज्यच्या कार्यालयास भेट दिली. व्यवस्थापकीय संपादक रोनित टोळ्ये यांनी त्यांचे स्वागत केले. सोबत सचिव मल्लिकार्जुन शिंदे, डॉ.नितीन ढेपे, महिला अध्यक्षा अनुपमा गुरव, बाळासाहेब क्षिरसागर आदी

# भगवंताची भक्ती हेच मनुष्य जीवनाचे कर्तव्य : डॉ.शिवकुमार महास्वामी

### अध्यात्मिक प्रवचनमालेस भाविकांची मोठी गर्दी



**सोलापूर** : मनुष्य जीवनाचे कर्तव्य काय आहे, याचे सर्वोत्तम चिंतन जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांनी केलेले आहे. भगवंताची भक्ती हेच मनुष्य जीवनाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन सद्गुरु श्री. डॉ. शिवकुमार महास्वामीजी यांनी केले. ओंकार आश्रम श्री सिध्दारुढ मठातर्फे जुळे सोलापुरातील इंडियन मॉडेल स्कूलजवळ आयोजित सात दिवसीय अध्यात्मिक प्रवचनमालेचा गुरुवारी दुसरा दिवस होता.

सद्गुरु डॉ. शिवकुमार महास्वामीजी यांनी दुसऱ्या दिवशी 'धन्य आम्ही जन्मा आलो, दास विठोबाचे झालो' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. शिवकुमार महास्वामीजी म्हणाले, संत महात्म्यांचे बोलणे ऐकायला चांगले वाटते, परंतु सर्वसामान्य मनुष्य त्याचे आचरण करीत नाही. मनुष्याने आपली कर्तव्ये ओळखली पाहिजेत. नरदेहाची सार्थकता कशात आहे याचे चिंतन केले पाहिजे. परमात्म्याची सेवा केली तर काहीही कमी पडत नाही. आपण गुरुचे पाईक झालो तर आपल्याला भगवंत निश्चित भेटतो.

विठोबाचे दास होण्यात धन्यता मानली पाहिजे. श्रीकृष्णाची अपार भक्ती करणाऱ्या मीराबाईंना अनेक आपत्ती आल्या. परंतु भगवंतानेच त्यांचा जीव वाचवला. मनुष्याने अति गर्व बाळगू नये. तसेच मोठ्यांशी अति वाद घालू नये, असेही सद्गुरु श्री. डॉ. शिवकुमार महास्वामीजी यांनी सांगितले. मठाधीश परमपूज्य मातोश्री सुशांतादेवी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन : सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर** : सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात विनापरवानगी गैर कायद्याची मंडळी जमवून जनावरे आणून बांधल्याप्रकरणी आ. बच्चू कडू शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्षसह सहा जणांवर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंद्रूप येथील एमआयडीसीमध्ये शेत जमीन गेलेल्या काही शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. सातबारा उताऱ्यावरील बोजा कमी करण्याच्या मागणीसाठी मागील काही दिवसापासून आंदोलन सुरू होते गुरुवारी या आंदोलनाला आ. बच्चू कडू शेतकरी संघटने उडी घेत काही शेतकऱ्यांसह जनावरे घेऊन संघटनेचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयात घुसले आणि थेट जनावरे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात नेली. जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वेठीस तर धरलेच मात्र पोलीस आयुक्तांच्या आदेशाचा भंग केल्याने हा गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस हवालदार शब्बीर तांबोळी यांनी फिर्याद दिली आहे. जिल्हाध्यक्ष अजित कुलकर्णी, शहराध्यक्ष जमीर शेख, मुजाहिद रमजान सय्यद, मुस्तफा जाकीर हुसेन रचभरे, मोहसीन नजीर तांबोळी, अकिब नाईकवाडी अशी गुन्हा दाखल झालेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नावे आहेत.












## परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षण महत्वाचे: संजय बडे

**सुराज्य/अकलूज** : शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित श्री हनुमान विद्यालय लवंग येथे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व थोर क्रांतिकारक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लवंग शाखेचे शाखाधिकारी संजय बडे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री हनुमान विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप शिर्के सर व बारकू खंडागळे सर यांनी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या महान कार्याची सखोल माहिती विद्यार्थ्यांना सांगितली तर विजयकुमार भोसले सर यांनी थोर क्रांतिकारक क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केलेल्या कार्याची विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. यावेळी ओंकार मिसाळ सानुली खंडागळे विश्वधन वाघमारे या विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या विषयी आपले विचार व्यक्त केले या कार्यक्रमाला रणजित पवार सर सुधाकर गंधले सर दत्तू साठे सुजाता म्हसवडे रेश्मा आतार शुश्रूषा मुळखेडे आदी सह विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिया फुगे यांनी केले कार्यक्रमाच्या शेवटी आभार विद्या यादव यांनी मानले

## महाराणी ताराराणी यांच्या कार्य कर्तृत्वातून प्रेरणा घेतली पाहिजे : शितलदेवी

**सुराज्य/सोलापूर** : महाराणी ताराराणी यांच्या स्मृतिदिनानिमित्त अकलूज येथील ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्राच्या वतीने महाराणी ताराराणी यांना अभिवादन करण्यात आले. प्रसंगी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष व ताराराणी कुस्ती केंद्राच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांनी कोणत्याही संकट प्रसंगी खचून न जाता आपण सर्वांनी ताराराणींचा आदर्श घेतला पाहीजे व जिद्दीने लढले पाहीजे असे सांगत ताराराणींच्या कार्य-कर्तृत्वास अभिवादन केले. पंचवीस वर्षांची एक विधवा राणी मुघल बादशहा औरंगजेबाशी लष्करी संघर्ष करावयास उभी राहते, सलग सात वर्षे संघर्ष करून त्यास चित करते, ही इतिहासातील एक असामान्य घटना आहे, त्याचप्रमाणे अखंड हिंदुस्थानातील लोकांना अभिमानास्पद व स्फूर्तिप्रद वाटणारी आहे. काबूलपासून बंगालपर्यंत व काश्मीरपासून कावेरीपर्यंत पसरलेल्या अफाट साम्राज्याच्या मोगल बादशहांशी सतत पंचवीस वर्षे लढा देवून शिवरायांनी स्थापन केलेले स्वराज्य जिवंत ठेवले हे आपल्या इतिहासातील सुवर्णपान आहे. एक रणरागिणी, कुशल प्रशासक म्हणून त्यांचे कार्य-कर्तृत्व दैदिप्यमान असे आहे, असे ही मोहिते-पाटील म्हणाल्या.

## तेजस लेंगरे याचे तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये यश

**सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजचा तेजस वसंत लेंगरे याने सोलापूर जिल्हा क्रिडा कार्यालया मार्फत आयोजित केलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये १९ वर्षे वयोगटात व %४ किलो वजन गटात फ्री स्टाईल या प्रकारात दुसरा क्रमांक मिळविला. हया कुस्ती बागेचीवाडी येथील लोकनेते स्व पै दत्ता वाघमारे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने संग्रामनगर येथील शिवनेरी तालीम याठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या. तेजस ह्याच्या या यशाबद्दल त्याला प्रशस्तीपत्र व ट्रा्फी देऊन गौरविण्यात आले. तेजसच्या हया दैदिप्यमान यशाबद्दल प्राचार्य कापसे एस डी, ज्युनिअर विभाग प्रमुख पाटील, क्रीडा शिक्षक माळी सर, स्थानिक स्कूल कमीटी यांच्या सह पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या कडुन तेजसचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पॅनल प्रमुख मोरे यांच्यावर हल्ला; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**सुराज्य/नातेपुते** : गुरसाळे (ता. माळशिरस) येथील ग्रामपंचायत निवडणूक होत असून या निवडणूकीत पॅनेल प्रूमूख श्रीकांत नानासाहेब मोरे याच्यावर रहात्या घरासमोर अज्ञान व्यक्तीने हल्ला केला असुन नागरिकांत भितीचे वातावरण पसरले आहे. बूधवार दि. ७/१२/२०२२ रोजी सायंकाळी५/३० वा. सूमारास गूरसाळे येथील घराच्या समोर श्रीकांत मोरे व पत्नी बसले असताना चारचाकि वाहनामधुन अज्ञान दोन व्यक्तीनै त्याच्यावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला, या झटापटीत पत्निच्या उजव्या हाताच्या अंगठ्याला व करंगळीचा भागाला जखम झाली असून चूलत भाऊ चंद्रशेखर मोरे, मूलगा अजिक्य मोरे, सुन शितल हे सर्वजण पळत आल्याने हल्लेखोर एक्सयुव्ही या चार चाकि गाडीतुन पळून गेले, दोन अनोळखी व्यक्ती विरोधात नातेपुते पोलिसात गून्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनी प्रविण संपांगे, ठाणे अंमलदार कदम, पाटील करत आहेत.

कर्नाटक-महाराष्ट्राचा सीमावाद

# गाव ठराव करणारे सरपंच आणि ग्रामसेवकातच वाद

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही गावांवर कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी दावा केल्यानंतर अक्कलकोट तालुक्यातील सीमावर्ती भागातील काही गावांना बळ मिळाले होते. त्यानंतर 'सुविधा द्या; नाही तर कर्नाटकात जाण्याची परवानगी तरी द्या' अशा मागणीचा ठराव करून ११ ग्रामपंचायतींनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. अशा ग्रामपंचायतीचे सरपंच आणि सदस्यांवर अपात्रतेची कारवाई करण्याची प्रशासनाने निर्णय घेताच ११ पैकी ६ ग्रामपंचायतींनी पळ काढला असून दिलेले निवेदन आणि केलेले ठराव रद्द करत असल्याचे सांगून त्यांनी आंदोलनातून माघार घेतली आहे.

तर ठरावाचा अजेंडा काढणाऱ्या त्या ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी जिल्हा परिषदेला दिल्याने अकरा गावातील ग्रामसेवकात एकच खळबळ माजली आहे. कारवाई च्या भितीने काही ग्रामसवकांनी संबंधित बीडीओ यांना लेखी निवेदन देत सदर ठराव ग्रामसभा न घेताच संबंधित गावचे सरपंच ग्रामपंचायत लेटर हॅडवर स्वत:च गाव ठराव लिहून दिल्याचे सांगितले आहे. आता महाराष्ट्र व कर्नाटक सीमावादात आता गावपातळीवरील सरपंच आणि ग्रामसेवकातच संघर्ष सुरु झाल्याचे तालुक्यात पहायला मिळत आहे. कर्नाटक महाराष्ट्र सीमाप्रश्न पेटलेला असतानाच अक्कलकोट तालुक्यातील ११ गावांनी सुविधा द्या; अन्यथा कर्नाटकात जाण्याची परवानगी द्या, अशा आशयाचे ठराव ग्रामपंचायतीमध्ये मंजूर करून त्यासंदर्भातील निवेदन जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानंतर ही गावे चर्चेत आली होती.

संबंधित गावांची इच्छा कर्नाटकात जाण्याची असेल, तर महाराष्ट्राने त्यांना अडवू नये, असे विधान कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांकडून आल्यानंतर या गावांना आणखी बळ मिळाले होते. त्यावरून सीमावर्ती भागात महाराष्ट्र विरोधात आणि कर्नाटकाच्या समर्थनाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगरताच ग्रामपंचायत ठराव वरुन सरपंच आणि ग्रामसेवकातच संघर्ष पेटल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. कर्नाटक महाराष्ट्र सीमाप्रश्न सुप्रीम कोर्टात न्यायप्रविष्ट असताना कोणालाही असा निर्णय घेता येत नाही, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकार कक्षेच्या बाहेर जाऊन ठराव केला आहे. वास्तविक पाहता ग्रामपंचायतीचे अधिकार वेगळे आहेत. एखाद्या राज्यात जाण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासनालासुध्दा नाहीत. त्यामुळे या ठरावाची जिल्हा प्रशासनाने गांभीरपणे दखल घेतली. अक्कलकोटच्या तहसीलदारांना अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

कर्नाटकात जाण्याचा ठराव करणारे ग्रामपंचायतीचे सदस्य, सरपंच यांना अपात्र ठरवण्याचा प्रस्ताव तयार करा, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी अक्कलकोटच्या तहसीलदारांना दिले आहे. याची माहिती मिळताच कर्नाटक राज्यात जाण्याचा ठराव करणाऱ्या ग्रामपंचायत सदस्य, सरपंच व ग्रामसेवकात एकच खळबळ माजली आहे. तर अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी आणि पद वाचवण्यासाठी केलेले ठराव परत घेत असल्याचे जाहीर करत एकूण सहा ग्रामपंचायतींनी तसे पत्र जिल्हा प्रशासनाकडे बुधवारी सादर केले आहे. तर ठराव करणाऱ्या ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकावर कारवाई च्या भितीने ग्रामसेवक आणि सरपंच मध्येच सुसूत्रता नसल्याचे पहायला मिळत आहे. आता सरपंच, सदस्य व ग्रामसेवक पैकी कारवाई कोणावर होणार हे पाहावे लागेल.

## परवानगीशिवाय जाहिरात फलक लावल्यास कारवाई

**सुराज्य/अक्कलकोट**




तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये यापुढील काळात जाहिरात फलक, वाढदिवसाचे बोर्डस् नगरपरिषद व पोलिस निरीक्षकांच्या पूर्व परवानगीशिवाय लावल्यास कायदेशीर कारवाई करावी असे राज्याच्या नगरविकास व गृहविभाग यांनी नगरपालिकेला कळविले आहे.

राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून श्री स्वामी समर्थांच्या नगरी ही टॉप फाईव्हमधील श्रीक्षेत्र असल्याने भाविकांची वाढती संख्या स्थानिक लोकसंख्या शहराची भौगोलिक परिस्थितीत पाहता अनेक जणांनी वाट्टेल त्या ठिकाणी भले मोठे जाहिरात बोर्ड फलक लावलेले आहे. यामध्ये वाढदिवसानिमित्त लावलेले होर्डिंग्सनेतर उच्छांद मांडला आहे. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होवून बाहेर गावहून आलेल्या भक्तांना श्री वटवृक्ष देवस्थान, स्वामी समर्थ समाधी मठ, अन्नछत्र मंडळ, गुरु मंदिर, यज्ञनगरीकडे जाणारा मार्ग, श्री विठ्ठल मंदिर, एकमुखी दत्त मंदिर, राजेराय मठ, बारा ज्योतिर्लिंग, ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन, शेख नुरद्दीन बाशा दर्गाह, संस्थानिक स्थळ, शाळा, महाविद्यालय आदी ठिकाणे हे शोधावे लागत आहे. याचे मूळ कारणच शहराचे विद्रुपीकरण, जाहिरात फलक, बोर्ड यामुळे वाढलेले आहे. पर्यटक विकास महामंडळाने ठिकठिकाणी लावण्यात आलेले स्थळ, दिशादर्शक फलके ही झाकुन गेलेले आहेत. यामुळे अनेक भक्तांना स्वामी मंदिराकडे जाण्याऐवजी बासलेगाव, निमगांव, अक्कलकोट स्टेशन, मैंदर्गी रोड, वागदरी रोडकडे जावे लागल्याचे उदाहरणे अनेक आहेत. अशा एक ना अनेक तक्रारी मुंबईतील स्वामी भक्त मंडळाचे थेट मंत्रालय गाठून राज्याचे मुख्य सचिव नगरविकास व गृहविभागाचे सचिव यांना तक्रारी पत्र दिल्याने सदर सचिव कार्यालयाकडून अक्कलकोट नगरपरिषदेस अप्पर मुख्य गृह सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या दि. १२ ऑक्टोंबर २०२२ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व पोलिस निरीक्षक उत्तर पोलिस ठाणे यांची यापुढे शहरात बोर्ड लावण्याकरिता पूर्व परवानगी घ्यावी लागणार आहे. न घेतल्यास कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागणार आहे. श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये बसस्थानका समोर, कारंजा चौक उद्यान लगत, फत्तेसिंह चौक, बायपास चौक, मंगरुळे चौक, ए-वन चौक साईड नं. २०, कमलाराजे चौक याच ठिकाणी स्थळ निश्चितीकरण नगरपरिषदेकडून करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी रितसर परवानगीने फलक लावण्यात यावे. सदर नियमाचा उल्लंघन केल्यास कायद्याचा बडगा उगारण्यात येणार आहे. या पुढील काळात नगरपरिषदेने चौरस मिटर प्रमाणे जाहिरात फलक लावण्याबाबतची आकारणी करुनच ती दिवसागणिक पावती करण्यात यावी.

## चोरुन वाळुची वाहतूक; चार महिने साधी कैद

**सुराज्य/अक्कलकोट** : तालुक्यातील बासलेगाव येथे चोरुन वाळु वाहतुक करणाऱ्या तिघाजणांना चार महिने साधी कैद व प्रत्येकी १० हजार रुपये प्रमाणे दंड, दंड न भरल्यास एक महिना साध्या कैद्याची शिक्षा प्रथम वर्ग दंडाधिकारी महेश पाटील यांनी सुनावली आहे.



११ मे २०११ रोजी रात्रौ ७. ४५ च्या दरम्यान दक्षिण पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी पेट्रोलिंग करींत असताना अक्कलकोट ते बासलेगाव रोड श्री तुळजाभवानी मंदिराजवळ चोरुन वाळु वाहतुक करीत असताना ट्रक व तीन ब्रास वाळुसह आरोपी संतोष वसंत राठोड, पांडु बाबु राठोड, निलू हरिश्चंद्र राठोड (रा. किणीमोड तांडा, ता. अक्कलकोट) यांच्यावर दक्षिण पोलिस ठाण्यात पर्यावरण कायदा कलम ९१५ सह ३%९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. दि. % डिसेंबर २०२२ रोजी आरोपीतांना न्यायालयात उभे केले असता सदरची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. याकामी सरकारी वकिल ॲड. गिरीष सरवदे, आरोपींचे वकिल ॲड. विजय हर्डीकर यांनी काम पाहिले. तपासिक अंमलदार म्हणून पोहेकॉ. वाय. वाय. शेख, कोर्ट पैरवी व न्यायालयीन कामकाज पोलिस उपनिरीक्षक राठोड, पो. कॉ. फडतरे यांनी काम पाहिले. सरकार पक्षाच्यावतीने चार साक्षीदार तपासण्यात आले. तब्बल ११ वर्षानी सदरचा निकाल लागला आहे.

## शेतीपंपांच्या इंजिनची दोन वेळा चोरी

**सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील शेतकरी अशोक रामचंद्र घोंगडे यांची कुसमोड हद्दीत गट नंबर १५३/ड/१ हया गटात स्वतःच्या मालकीची जमीन आहे. शेजारी कनाल आहे तसेच रहदारीचा रस्ता आहे याठिकाणी घराजवळ ५ एच पी लक्ष्मी कंपनीचे इंजिन ठेवले होते. ६ डिसेंबर रोजी घरामध्ये कोणी नसल्याने सदरचे इंजिन अज्ञात व्यक्तींने चोरुन नेले आहे. याठिकाणाहुन अंदाजे दोन वर्षापुर्वी सुध्दा इंजिन चोरीला गेले होते याची रितसर तक्रार मी आपणाकडे दिली होती मात्र त्याचा तपास अदयापही लागला नाही अशी तक्रार अशोक रामचंद्र घोंगडे यांनी पिलीव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्याकडे केली आहे. याचा योग्य तपास होऊन मला न्याय मिळावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## अकलूज येथे विरविजय चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**सुराज्य/अकलूज**

श्रीराज भैय्या मित्र मंडळ यांच्या वतीने अकलूज येथे विरविजय चषक जिल्हावाईज एक दिवसीय डे नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये राज्यस्तरीय संघांना आमंत्रित करण्यात आले आहे.

या स्पर्धा विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल अकलूज येथे आयोजित करण्यात आल्या असून यामध्ये विजेत्या प्रथम संघास १ लाख बक्षीस तर द्वितीय ५१ हजार, तृतीय २१ हजार, चतुर्थ विजेत्या संघास २१ हजार असे बक्षीस देण्यात येणार आहे. याशिवाय मॅन ऑफ द मॅच, बेस्ट विकेटकीपर, बेस्ट बॉलर, विकेट हॅट्रिक, मॅन ऑफ द मॅच, फायनल मॅन ऑफ द सिरीज अशी विविध बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. सदर स्पर्धेमध्ये राज्यस्तरीय महत्त्वाच्या संघांना आमंत्रित करण्यात आले असून स्पर्धा पाहण्यासाठी क्रिकेट चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या स्पर्धा रविवार दि २५ डिसेंबर रोजी पार पडणार असून माळशिरस तालुका टेनिस क्रिकेट असोसिएशनने आयोजनासाठी सहकार्य केले आहे. आधिक माहितीसाठी कृष्णा पवार ७२६३८२८०२%, रोहीत देशमुख, निनाद पवार, अमीर भाई, अक्षय बोडरे यांच्याशी संपर्क साधावा व सर्व क्रिकेट रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## माळी महासंघाच्या प्रदेशाध्यक्षपदी वाघमारे

**सुराज्य/सोलापूर** : सौंदणे (ता. मोहोळ) येथील शंकरराव वाघमारे यांची माळी महासंघ महाराष्ट्र राज्य किसान आघडी च्या प्रदेश अध्यक्षपदी नुकतिच निवड जाहिर झाली आहे. माळी महासंघाचे राष्टिय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली माळी महासंघाचे अरुण तिखे यानी ही निवड नुकतीच घोषित केली आहे. मोहोळ तालुक्यातील सौंदणे येथील रहिवाशी असणारे वाघमारे हे गेल्या ३५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत.



यापूर्वी त्यांनी नशामुक्ती, दारुबंदी आदी विषयावर जनजागरण करित कामं केले आहे तसेच सुमारे २० वर्ष सामुदायीक विवाहचे आयोजन केले आहे. श्री संत सावता माळी प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी कार्यक्रम केले आहेत. यामुळे त्याना यापूर्वी अनेक समाज उपयोगी कार्यक्रम केलेमुळे अनेकदा पुरस्कार देखील मिळाले आहेत. सौंदने ग्रामपंचायतचे सरपंच तसेच पंचायत समिती सदस्य या पदावर देखील त्यानी काम केले आहे. त्यानी रक्तदान सारखे उपक्रम देखील यापूर्वी केले आहेत. तचेच भारतीय जनता पक्षाच्या जिल्हतील संघटना वाढीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. भाजप चा गावचा सामान्य कार्यकर्ता ते जिल्हाध्यक्ष असा त्याचा प्रवास राहिलेला आहे. सध्या ते महाराष्ट्र भाजपच्या किसान आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून ही त्यांचे कड़े जबाबदारी आहे. या निवडी बद्दल समाजातील सर्व स्थरातुन त्यांचे अभिनंदन होत आहे.

## अपहरणकर्त्या बालकाच्या शोधासाठी जनहित संघटनेचा रास्ता रोको

**सुराज्य/सोलापूर**

मंगळवेढा शहरातील एम. आय. डी. सी. परिसरातून अपहरण झालेल्या चार वर्षीय बालकाचा शोध घेण्यात अठरा दिवसानंतरही पोलिसांना यश न आल्यामुळे तसेच पोलिसांनी तात्काळ याचा शोध घ्यावा, पालकमंत्र्यांनी अपहरणकर्त्यांच्या कुटुंबियांना भेट देवून दिलासा दयावा या मागणीसाठी जनहित शेतकरी संघटनेने शहराच्या दामाजी चौकात रास्ता रोको आंदोलन केले

१८ नोव्हेंबर रोजी एम. आय.डी. सी.परिसरातून रणवीरकुमार साहू (छत्तीसगढ,वय ४) याचे अज्ञाताने फूस लावून अपहरण केले आहे.पोलिस तपास घेत आहेत मात्र अठरा दिवसानंतरही त्याचा शोध लागला नाही.


जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सदर अपहरणकर्त्याच्या कुटुंबियांना भेटून त्यांना दिलासा देणे गरजेचे असताना अदयापही पालकमंत्री इकडे फिरकले नाहीत तरी चार दिवसात ते कुटुंबियांना न भेटल्यास त्यांना सोलापूर जिल्हयात प्रवेशबंदी करण्याचा इशारा आंदोलकर्त्यांनी दिला आहे. बालकाचा आपहरण झाल्यापासून मंगळवेढा तालुक्यातील लहान लहान मुलं त्यांची आई वडील अक्षरशः घाबरलेले आहेत. त्यांना शाळेवर सोडताना पालकांना स्वतः काम सोडून जावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे तरी शासनाने राज्य यंत्रणा मजबूत करून भविष्यात होणाऱ्या दुसऱ्या निष्पाप लेकराचे अपहरण थांबवावे अशी मागणी करण्यात आली. आंदोलना दरम्यान प्रशिक्षार्थी नायब तहसीलदार प्रशांत पाटील यांना मागणीचे निवेदन स्विकारले यावेळी उत्तम सरडे ,रघु चव्हाण , बाळासाहेब नागणे, निसार पाटील, दामाजी मोरे, नाना बिचुकले, हैदर पठाण, बंडू शेणवे , सत्यवान घोडके उपस्थित होते.

# सहकाररत्न -कृषिरत्न- समाजभूषण कैं. बाबुरावअण्णा चाकोते

**सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी सतत झटून त्यांच्या जीवनात नंदनवन फुलवणारे कै. बाबुराव आण्णा चाकोते यांच्या पुण्यस्मरणार्थ त्यांच्या कार्याचा ऋण केव्हातरी समाजापुढे येवून त्यांच्याबाबत कृतज्ञता व्यक्त करावे म्हणून हा लेख प्रपंच.**

---

सहकारी संस्थाच्या माध्यमातून व्यापारी, शेतकरी, कामगार, गोरगरीब, दलित पिडीत जनसामान्याचे जीवन उजळून टाकणारे विवेकि विचाराचे नेतृत्व कै. बाबुराव चाकोते यांच्या रूपाने श्री सिध्देश्वराच्या पुण्य नगरीला लाभले. साधा सरळ जीवनमार्ग अंगिकारलेल्या या नेत्याला कधी कुठलाच मोह, अहंकार, सत्तेची गुर्मी आली नाही. सतत ४/५ दशके लोकांशी थेट संपर्क साधात लोकांचे, संस्थेचे प्रश्न सोडवण्यासाठी कै. आप्पासाहेब काडादी, शंकरप्पा धनशेट्टी, शिवदारे आण्णा, ब्रह्मदेव माने, सातलिंगप्पा म्हेत्रे, आलुरे गुरूजी, नामदेवराव जगताप, आनंदाराव देवकते, महादेव पाटील, काका साठे, घोडके सरकार, कमळे गुरूजी यांच्या समवेत काम करणारा हा कर्मयोगी आज जिवंत असता तर विमानसेवा व चिमणी संदर्भात सुरू असलेले वादळ समजोत्याने, सामोपचाराने आणि सामंजस्याने सोडवला असता.



बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून शरद सहकारी सूतगिरणीची स्थापना बाबुराव आण्णांनी केली. पारंपारिक शेतीच्या मागे न लागता कापूस उत्पादनाकडे शेतकऱ्यांनी वळावे योग्य भाव कापसाला देण्याची हमी आण्णांनी घेतली.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजारसमिती ही आण्णांनी नावारूपाला आणली. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील लोकांनी सोलापूरच्या या बाजार समितीमधील योजनाबध्द बांधकाम, स्टोअरवेज, सेल हाऊस, वेअर हाऊस, भाजी, फळ, कांदा, मिरची बाजार, ऑईल मिल, दाळ मिल, भुसार आडत, दलाल व्यापारी, कडबा मार्केट, जनावर बाजार अशा वेगवेगळ्या ठिकाणी विभागणी केलेल्या वास्तु पाहून त्यांनी त्यावर त्यांच्या ठिकाणी जावून अंमलबजावणी केली. सुसज्ज, सुंदर आणि प्रशस्त तसेच वैशिष्ट्यपूर्ण बाजारसमिती निर्माण केल्याने सोलापूर बाजार समितीची गणना देशात आणि आशिया खंडात होत आहे. याचे सर्व श्रेय बाबुराव आण्णांनाच जाते. आण्णांच्या परिस्पर्शाने अनेकांचे सोने झाले. आण्यांनी जिल्हा बँक, मार्केट कमिटी, महानगर पालिका, साखर कारखाना, सूत गिरणी, सरकारी कार्यालये, निमसरकारी कार्यालयात अनेकांना नोकरीला लावून त्यांचे संसार उभा केले. अनेकांचे लग्न लावले, घर बांधले कर्मचाऱ्यांना आर्थिक सुबत्ता मिळवून देत जीवनात आनंद फुलवणारे बाबुराव आण्णा आज आपल्या मध्ये नाहीत याचा आम्हा सर्वांना खेद व खंत वाटते.

बाबुराव आण्णांच्या कार्याचा वसा खऱ्या अर्थाने त्यांची मुले आणि नातवंडे पुढे नेत आहेत. महादेव चाकोते शांत संयमी, विश्वनाथ चाकोते हे तर उत्तुंग भरारी घेणारे व्यक्तीमत्व, सिध्दाराम शांत स्वभावाचे त्यांच्या नंतर त्यांची नातवंडे सुध्दा सामाजिक कार्यात पुढे आहेत. प्रतिकुल परिस्थितीत बाबुराव आण्णांनी आपल्या सामाजिक जीवनाला सुरूवात केली आणि सोलापूर नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एक आदर्श नेता म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला नगरसेवक, नगराध्यक्ष, महापौर, दोनदा आमदार, १५ वर्ष मार्केट कमिटीचे अध्यक्ष, सिध्देश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष, जिल्हा बँकेचे अध्यक्ष, शरद सूत गिरणीचे अध्यक्ष, राज्यस्तरावरील विविध क्रिडा संघटनांचे पदे भूषवत बाबुराव आण्णांनी त्यांच्या ५५ वर्षाच्या सामाजिक, राजकीय जीवनात उत्तुंग अशी कामगिरी केली जनसामान्यांसाठी झटले, लोककल्याणकारी योजना राबवल्या सर्वसामान्यांना लाभ मिळवून देताना त्यांचा आर्थिकस्तर उंचावला पाहिजे अशी भूमिका ठेवून आयुष्यभर झटणारे बाबुराव आण्णा आज आपल्यात नाहीत त्यांच्या १९ व्या पुण्यस्मरणार्थ विनम्र अभिवादन.



# चार रेल्वे गाड्यांमधून चार प्रवाशांचे दागिने लंपास



सुराज्य/कुर्डूवाडी

रेल्वेच्या चार वेगवेगळ्या गाड्यांतून प्रवास करणाऱ्या चार प्रवाश्यांचे मोबाइल, लॅपटॉप, सोन्या चांदीचे दागिने असा एकूण २ लाख २३ हजार ३०० रूपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. याबाबत चारही प्रवास्यांनी कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

पहिल्या फिर्यादी अभिलाषा योगेश जैन रा. काचीगुडा हैद्राबाद या दि. ५ रोजी राजकोट-सिकंद्राबाद (२२७१७) एक्सप्रेसने कोच नं. एस ४ मधून सीट नं ५५ वरुन प्रवास करत असताना सदर गाडी रा. ११.३० ते ११.४५ दरम्यान वाशिंबे रेल्वे स्टेशनच्या आउटरला अज्ञात चोरट्याने सिग्नल कट करुन गाडी थांबवून खिडकीतून हात घालून सीटवरील पर्स ज्यामध्ये २५ हजार रुपये किंमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाइल, ३५ हजार रुपये किंमतीचा आयफोन ७ हजार पाचशे रुपये रोख, ३०० रुपयांची लेडिज पर्स व कागदपत्रे असा एकूण ६५ हजार ३०० रूपयांचा ऐवज होता. ती पर्स अज्ञात चोरट्याने आतील सामानासह पळवून नेली. जैन यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पो. कॉ. रोकडे हे करीत आहेत.

**दुसरी घटना**

फिर्यादी कीर्तीकुमार कृष्णा चौधरी रा. लातूर हे सोमवार दि. ५ रोजी मुंबई लातूर एक्सप्रेस (२२१०७) ने कोच नं. एस १ मधून सीट नं ३९वरुन प्रवास करत असताना पहाटे ५.०५ वाजण्याच्या सुमारास गाडी उस्मानाबाद रेल्वे स्टेशन दरम्यान धावत असताना अज्ञात ३० ते ३५ वर्षाचा इसम सडपातळ बांधा उंची ५ फूट ४ इंच याने उशाखाली ठेवलेली बॅग ज्यामध्ये ३७ हजार ५०० रूपयांचा लॅपटॉप, व १ हजार रुपयांची स्पोर्ट बॅग असा एकूण ३८ हजार ५०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत चौधरी यांच्या फिर्यादीवरुन कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.तपास पो. ना. पाटील हे करीत आहेत.

**तिसरी घटना**

फिर्यादी मुंजाभाऊ सखाराम बोरटकर रा. कोठाळा जि. परभणी हा रविवार दि. ४ रोजी पंढरपूर देवदर्शन घेऊन परत गावी जाण्यासाठी पंढरपूर रेल्वे स्थानकात रा. ७.४० वा सुमारास फलाट क्र. १ वरील प्रतिक्षालयात रा. ११.३० वा असणाऱ्या मिरज-परळी गाडीची वाट पाहात बसला होता. दरम्यान तिथे दोन अनोळखी इसम शिव्या देत तुझ्या खिशात काय आहे ते दे नाही तर तुला इथेच मारून टाकू. नकार देताच त्याला दोन चापटी मारून खाली पाडत फिर्यादीच्या खिशातील विवो कंपनीचा सुमारे ८ हजार ५०० रूपयांचा मोबाइल हिसकावून घेऊन पळून जाऊ लागले. फिर्यादीने आरडाओरडा करताच रेल्वे पोलिस व इतर नागरिक धावत जाऊन त्या दोघांचा पाठलाग करत एकाला पकडले व एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला. आकाश शंकर शिंदे यल्लापूर बिदर असे पकडण्यात आलेल्याचे नाव असून त्याची झडती घेतली असता फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे त्याच्या वर्णनाचा मोबाइल त्याच्याकडे मिळून आला. बोरटकर याच्या फिर्यादीवरुन कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे .पुढील तपास पोलिस उप निरीक्षक ठोकळ हे करीत आहेत.

**चौथी घटना**

फिर्यादी सुषमा विश्वकर्मा व त्यांचा भाऊ रा. खराडी, पुणे हे रविवार दि. ४ रोजी हैद्राबाद हडपसर एक्सप्रेस (१७०१४) ने कोच नं. एस ६ मधून सीट नं ७३७६ वरुन प्रवास करत असताना गाडी उस्मानाबाद रेल्वे स्थानक येथे थांबून हळूवारपणे चालत असताना चालू गाडीत फिर्यादीची पर्स ज्यामध्ये ७० हजार रुपये किंमतीचे १५ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, १२ हजार रुपये किमतीचे ३ ग्रॅम वजनाचे कानातले जोड, ४ हजार रुपये किंमतीची ५ ग्रॅम वजनाची अंगठी, ६ हजार रुपये किंमतीचे २ ग्रॅम वजनाचे कानातील जोड, १५ हजार रुपये रोख, २ हजार रुपये किमतीचा चांदीचा छल्ला चोरी झालेली २ हजारांची पर्स असा एकूण १ लाख ११ हजार रूपयांचा ऐवज अज्ञात २५ वर्षाच्या ५ फूट ५ इंच उंची व रंगाने गोरा असणाऱ्या चोरट्याने चोरून नेली. यावेळी आरडाओरडा केला असता चालत्या गाडीतून चोरट्याने धूम ठोकली. याबाबत फिर्यादी विश्वकर्मा यांच्या फिर्यादीवरुन कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठोकळ हे करीत आहेत.

# महापुरुषाची बदनामी करणे भाजपाची परंपरा : आ.मिटकरी



सुराज्य/पंढरपूर

भाजपचे अनेक वाचाळवीर मागील ८ दिवसापासून महापुरुषांच्या संदर्भात अपमान अपमानास्पद वक्तव्य करत आहेत. त्या भाजपाच्या वाचाळवीऱ्यांच्या मस्तकातील घाण काढण्यासाठी गाडगे महाराजांचा झाडू हातात घ्यावा लागेल, असे मत आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केले.

पंढरपूर येथे अहिल्यादेवी होळकर वाड्यातील राम मंदिरात दर्शनासाठी मिटकरी आले होते. यावेळी आदित्य फत्तेपुरकर, श्रीकांत शिंदे, संदीप मांडवे, गणेश पिंपळनेरकर, महम्मद उस्ताद उपस्थित होते. ते पुढे म्हणाले, वास्तविक पाहता कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकवर्गणीतून गोरगरीब लेकरांकरीता शाळा उभा केल्या आहेत. भाजपमध्ये असलेल्या वाचाळविरांच्या मस्तकातली घाण साफ करायला संत गाडगे महाराजांचा झाडू घ्यावा लागणार आहे. अशी बेताल वक्तव्य करून महाराष्ट्राच्या मूळ मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न भाजपचा आहे.

महाराष्ट्रातील तरुणांनी चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्य अतंत्यंत गांभीर्यन घ्यावे. आमच्या महापुरुषांनी भीक मागून शाळा केल्या असे ते म्हणाले व नवीन शिक्षण संस्था उभ्या होत आहेत त्यांनी सीएसआर फंड मधून शाळा उभ्या केल्या पाहिजेत. असा अजब सल्ला चंद्रकांत पाटलांनी दिला आहे. इथून पुढे रस्त्यावरची लढाई करण्याकरिता महाराष्ट्राने सज्ज राहावे असे अमोल मिटकरी यांनी सांगितले.

# आयुक्तांची कचरा डेपो, बायोएनर्जी प्रकल्पाला भेट

**▸ ओला कचरा व सुका कचरा वर्गीकरण करण्याचे आवाहन**

**सोलापूर** : आयुक्त शीतल तेली-उगले यांनी गुरूवारी तुळजापूर रोडवरील कचरा डेपो, बायोएनर्जी प्रकल्प तसेच नियोजित आजोरा विलगीकरण प्रकल्पाला भेट दिली. शहरातील नागरिकांनी ओला कचरा व सुका कचरा वर्गीकरण करूनच घंटागाडीत टाकावा असे आवाहन त्यांनी केले. कचरा डेपोजवळ संरक्षक भिंती उभे करण्याची सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली. बायोएनर्जी प्रकल्पाजवळील ओला-सुका कचरा वर्गीकरण, वीजनिर्मितीचीही त्यांनी पाहणी करून व आवश्यक त्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर तुळजापूर रोडवरील नियोजित आजोरा विलगीकरण प्रकल्पाचीही त्यांनी पाहणी केली.

आजोरा विलगीकरण प्रकल्प लवकरच सुरू करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना केल्या. कचरा डंपिंग स्टेशनजवळ घंटागाड्या कर्मचाऱ्यांकडून ओला व सुका वर्गीकरण करण्यात येतो, मात्र नागरिकांनाच ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण केल्यास डंपिंग स्टेशनजवळ वर्गीकरणाची वेळ येणार नाही.

# शांतता बाळगल्यास जीवनात समृध्दी : सुरवसे-पाटील

सुराज्य/अकलूज

जीवन जगत असताना प्रत्येकाने शांततेचा मार्ग अवलंबल्यास समृध्दी येते असे मत पोलीस परीवाराचे समन्वयक पोलीस हवालदार रमेश सूरवसे पाटील यांनी व्यक्त केले.

अकलूज येथील लोकायत लोकसंचलित साधन केंद्राच्यावतीने यशवंतनगर येथील सावित्रीबाई फूले सभागृहात स्त्री पूरूष समानता जंडर ईक्वीलायझेशन कार्यक्रम पार पडला.यावेळी महिलांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रम व्यवस्थापक तनुजा पाटील, शुभांगी पवार,पोलीस मित्र परीवाराचे राज्यसंघटक नंदकूमार कांबळे व सूनिल भगत यांचे प्रमूख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी महीलांना सायबर क्राईमसह, जीवनातील अनंत अडचणीवर मात करणे, महीलांनी खोटया विनयभंग छेडछाडीच्या केसेस करू नयेत ईथंपासून ते रोडरोमीयोंना धडा कसा शिकवावा पोलीसांची व मान्यवर वकीलांची मदत कशी घ्यावी, संसारात संयम व शांतता असल्यास सूख मिळते. नेहमीच चिडचीड व दोष देवून रागाराग करणे आदी विषयावर सुरवसे पाटील यांनी मार्गदर्शन केले. व्यवस्थापिका तनूजा पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. शेवटी सौ कामिनी ताटे देशमूख आणि शूभांगी पवार यांनी आभार मानले.




# कुसमोड यल्लामा देवीची यात्रा

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील यल्लामा देवीची यात्रा दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

४ डिसेंबर रोजी पालखीचे मंदीराजवळ आगमन, ५ डिसेंबर रोजी देवीचा महानैवेद्य तर ६ डिसेंबर रोजी पहाटे देवींच्या फुलाचा मान चंद्रकांत सरगर यांना महाआरती डॉ. उत्तमराव सरगर यांच्या हस्ते, सकाळी ९ वाजता माहेरासाठी पालखीचे गावात आगमन, सकाळी ११.३० मानकरी संतोष व्होनमाने यांच्या हस्ते तलवार उचलणे कार्यक्रम, त्यांनंतर दुपारी २.४५ वाजता अशोक सातपुते यांच्या घराजवळील कुंडाजवळ पालखीचे आगमन, कुंडाचा नारळ सरपंच तुषार लवटे यांच्या हस्ते फोडण्यात आला. वेशीमध्ये मानकरी अशोक राजगे, सागर व्होनमाने, पुजारी सिध्देश्वर व्होनमाने यांच्या हस्ते फोडण्यात आला त्यानंतर पालखीचे मंदीराकडे प्रस्थान झाले. याची सुरुवात श्याम धायगुडे यांच्या हस्ते नारळ फोडुन करण्यात आला.

अग्नी होमाच्या माळेचे मानकरी सतीश व्होनमाने व गणेश व्होनमाने यांना देण्यात आला. यावेळी तुकाराम व्होनमाने, सदाशिव व्होनमाने, मधुकर व्होनमाने, ज्ञानदेव व्होनमाने, चंद्रकांत सरगर, डॉ.सुरेश सातपुते, प्रकाश मोरे, रामा पालखे, ज्ञानदेव सातपुते, प्रमोद मोरे, गौतम मोरे, सिध्देश्वर व्होनमाने, नवनाथ व्होनमाने, सतीश व्होनमाने यांनी अग्नी होमातुन प्रवेश केला. यावेळी मळोली येथील बाळासाहेब जाधव यांनी एक किलो चांदीची मुर्ती भेट दिली.

# यावलीतील डीपी जळाला; शेतकऱ्यांची अडचण

सुराज्य/चिखली

हिवरे (ता. मोहोळ) येथील वीज उपकेंद्राअंतर्गत येणाऱ्या यावली शिवारातील 'जुना गावडेपी' नावाने परिचित असलेला ट्रान्सफॉर्मर (डीपी) हा गेल्या वर्षी खाली जळाला आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना रब्बी पिकांना पाणी देणे मुश्कील झाले असून. 'साहेब, आमची डीपी लवकर बसवा, अशी विनवणी शेतकऱ्यांनी वीज कंपनीकडे केली आहे.



गेल्या तीन वर्षापासून शेतकरी दुष्काळाला सामोरे जात आहेत. त्यातच यंदा अवकाळी पावसाने खरिपाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. यावली शिवारातील जुना गावठाण ट्रान्सफार्मर हा शंकर ढगे यांच्या शेतात असून हा ट्रान्सफॉर्मर तीन वेळा जळला आहे. सुरुवातीला जळालेला ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी शेतकऱ्यांना तब्बल एक वर्ष प्रतीक्षा करावी लागली. शेतकऱ्यांनी वारंवार विनवणी केल्यानंतर महावितरण कंपनीने नवीन ट्रान्सफॉर्मर आणून देखील बसविला तोही रातीतच जळून गेला. दुसरा ट्रान्सफार्मर आणून बसविला तोही लोड घेण्याअगोदर जळून खाक झाला आहे. विशेष म्हणजे-नवीन ट्रान्सफार्मर (डीपी) बसविल्यानंतर महावितरणचे कर्मचारी हे मेन लाईन चालू करून एलटी लाईनचा लोड देण्याच्या विचारात होते परंतु मेन लाईनचा सप्लाय चालू करतानाच ट्रान्सफार्मर (डिपी) मधून धुर बाहेर निघून क्षणांतच जळून खाक झाला. दुसरींकडे मात्र नवीन ट्रान्सफार्मर कधी मिळणार शेतीला पाणी कधी देणार आमची उभे पिके पाण्याअभावी जळून जाणार या भितीने शेतकरी चिंतेत आहेत. विजेअभावी पिकांना पाणी देता येत नसल्याने शेतकरी हताश झाल्याने येथील शेतकऱ्यांनी थेट मोहोळ येथील वीज कंपनीचे उपकार्यकारी अधिकारी वनारसे यांना फोन द्वारे विचारणा केली असून त्यांनी 'बघतो, कनिष्ठ अभियंत्यांना सांगतो, लवकरच डीपी देऊ अशी उत्तरे दिली आहेत.

# बुध्दिबळ स्पर्धेत जैन गुरुकुल प्रशालेचे यश

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिका सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे संपन्न झालेल्या शालेय शहरस्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेच्या इयत्ता १० वीतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.



यामध्ये १९ वर्षाखालील गटात रितेश श्रीनिवास सादुल, साक्षी शाहुराज पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळविला व १७ वर्षाखालील गटात प्रथमेश प्रशांत शिंदे, श्वेता नितिश पवार या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या विद्यार्थ्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक सुभाष उपासे, प्रसन्न काटकर व क्रीडा विभागप्रमुख संजय पंडित यांचे वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक आशितोष शहा, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक राजकुमार काळे, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# नातेपुते नगरपंचायतीच्या सभागृहाचे सुशोभीकरण करून कार्यक्रमास देण्याचा निर्णय

**नातेपुते** : नातेपुते नगरपंचायत कार्यालयाच्या वरती अहिल्यादेवी होळकर सभागृह आहे. त्या सभागृहाच्या सुशोभीकरण करून कार्यक्रमास देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सभागृहाचे कामकाज ग्रामपंचायत काळामध्ये आठ वर्षापूर्वी झालेले होते. परंतु तेव्हापासून सभागृहाचा वापर कशासाठी करावा याबाबत कोणतेही निश्चित धोरण नव्हते. या सभागृहाचा वापर चांगल्या पद्धतीने व्हावा याकरिता नातेपुते नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख नगरसेवक,




मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर ,शासकीय , निम शासकीय कार्यक्रम तसेच शालेय कार्यक्रम याकरिता सभागृहाचा वापर करण्यात येणार आहे. दोन्ही सभागृहाचे शुशोभीकरण करून नागरिकांच्या वापरासाठी सभागृह खुले करण्यात येणार आहे. यासाठी लागणारा निधी हा आ. रणजितसिंह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांच्या स्थानिक निधी तसेच वैशिष्ट्यपूर्ण योजना यामधून उभा करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष तसेच नगरसेवक यांनी सांगितले. यावेळी या बैठकीसाठी नगराध्यक्ष उत्कर्षरणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमख, मुख्याधिकारी माधव खांडेकर, मामासहेब पांढरे, अतुल पाटील, बाळासाहेब काळे, सुरेश सोरटे, रणजित पांढरे, अण्णा पांढरे, शशिकांत बरडकर, अतुल बावकर, भानुदास राऊत, दादा उराडे, दिपक काळे, रावसाहेब पांढरे, अविनाश दोशी, नंदू लांडगे, ज्ञानेश्वर उराडे, अमित चांगण उपस्थित होते.




# तंत्रज्ञानाने समाजाचा विकास करणे आवश्यकः शेवगावकर

**पंढरपूर** : तंत्रज्ञान आणि समाज हे दोन्ही घटक एकमेकांवर अवलंबून आहेत. आजचे २१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक आहे. तंत्रज्ञानाच्या वापरातून आज मानवासमोर अनेक आव्हाने देखील निर्माण झाली आहेत. आज नैसर्गिक ऊर्जास्रोत कमी कमी होत चालले आहेत तसेच इतरांशी आवश्यक असणारा संवादही कमी होत चालला आहे. त्यामुळे आज तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजाचा शाश्वत विकास साध्य करणे आवश्यक आहे.' असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्लीचे माजी संचालक व सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. रघुनाथ शेवगावकर यांनी केले.

स्वेरीमध्ये १० डिसेंबर रोजी टेक्नो-सोसायटल २०२२' ही चौथी आंतरराष्ट्रीय परिषद होत असून या परिषदेच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी संचालक रघुनाथ शेवगावकर हे मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी स्वागत केले.

यावेळी अगुस बुधीयोनो (इंडोनेशिया), यावेळी प्रा.अशोक रानडे (कॅनडा), जे एम. चंद्रकिशन, राजाराम देसाई, डॉ.पद्माकर केळकर, डॉ. आय. थीरूनावक्कारसु, डॉ. आर. बालसुब्रमण्यम, डॉ. व्ही. के. सुरी, डॉ. व्ही. जे. कुलकर्णी, डॉ. दिलीप वाकुलाबरनम आदी उपस्थित होते. शनिवार दि.१० डिसेंबर रोजी डॉ.बोतीर उस्मानोव्ह (उझबेकिस्तान), प्रा.तीर्थांकर बॅनर्जी (ऑस्ट्रेलिया), डॉ. नेहा बियाणी (अमेरिका), डॉ. वेंकट रेड्डी (दुबई) हे मार्गदर्शन करणार आहेत.

# आरोग्यासाठी कराटे आत्मसात करा : डॉ.झाडबुके

सुराज्य/मोहोळ

आरोग्य सर्वात मोठी संपत्ती आहे. पैसा, गाडी, बंगला, अमाप संपत्ती कितीही असो पण आरोग्य नसेल तर त्याचा काहीही उपयोग नाही.

आरोग्य चांगले ठेवण्यासाठी विद्यार्थी दशेमध्येच भविष्यातील उत्तम आरोग्यासाठी कराटे आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मोहोळ तालुका डॉक्टर असोसिएशनचे सचिव डॉ. शैलेश झाडबुके यांनी केले. क्रांतिवीर भगतसिंग मार्शल आर्ट्स ॲकॅडमीच्यावतीने घेण्यात आलेल्या ओकिनावा मार्शल आर्ट्स ॲकॅडमीच्या ज्युनिअर कलर बेल्ट एक्झाममध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ डॉक्टर्स असोसिएशनचे सचिव डॉ. शैलेश झाडबुके, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कैलास खडके, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रवीण डोके यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला, यावेळी डॉ. झाडबुके हे बोलत होते.



यावेळी येलो बेल्टमध्ये यशस्वी झालेल्या सुष्मिता कोळेकर, जयेश नागटिळक, राज नागटिळक, आर्या माने तर ऑरेंज बेल्टमध्ये यशस्वी झालेले अथर्व माडकर, अर्जुन शास्त्री, मृण्मयी नागटिळक, तनुजा बारसकर, प्रणिती ढवन, यशराजे ढवन, शंभूराजे ढवन, हर्षवर्धन भोसले, रुचिरा मंगरूळे, सुधांशू नाईकनवरे, भाग्यश्री माने, आदर्श सुळे, समर्थ सलगर, ज्ञानदा नरूटे, प्राची साळुंके, श्रद्धा साळुंके यासह ग्रीन बेल्ट मध्ये यशस्वी झालेले समृद्धी पांढरे, सिद्धी पांढरे, शार्दूल आष्टेकर, कृष्णाली नरुटे, प्रतीक दगडे, हर्षदा वाघमोडे, विराट वाघमोडे, श्रावणी खताळ आदींचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

# यंदाचा गळीत हंगाम लवकरच संपणार?

**पिलीव** : यंदा पाऊसमान कमी असल्यामुळेच उसाचे उत्पन कमालीचे घटले आहे. गतवर्षी च्या तुलनेत यंदा निम्मे उत्पन्न झाले आहे. यामुळे यंदा ऊसतोडणी अतिशय कमी वेळेत होत आहे. यामुळे यंदाचा गळीत हंगाम लवकरच आटोक्यात येण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनचा कल गतवर्षी चांगला दर देणाऱ्या कारखान्याकडे आहे. गतवर्षी ऊसतोडणी साठी झालेला त्रास यंदा नाही. यामुळे शेतकरी समाधानी आहे.

सोलापूर जिल्हात व माळशिरस तालुक्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाऊसमान कमी झाला आहे. यामुळे ऊसाची योग्य वाढ झालेली नाही. गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस पडल्यामुळे ऊसाची चांगली वाढ झाली होती तर यंदा मात्र तशी परिस्थिती नाही. त्या तुलनेत यंदा ऊसाचे क्षेत्र कमी आहे तर माळशिरस तालुक्यातील सर्वच साखर कारखाने वेळेत सुरु झाले आहेत. तसेच बाहेरील जिल्ह्यातील साखर कारखाने माळशिरस तालुक्यातील ऊस मोठ्या प्रमाणावर नेत आहेत. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांनचा सुरु असो किंवा खोडवा ऊस असो अगदी वेळेवर तोडला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना गेल्या वर्षी ऊसतोडणीसाठी त्रास झाला होता. तो यंदा नाही. तसेच शेतकऱ्यांना ऊसतोडणीसाठी आर्थिक भुरदंड सुद्धा सोसावा लागत नाही. गतवर्षी ऊसतोडणी साठी झालेला त्रास यंदा नाही. यामुळे शेतकरी समाधानी आहे.

## महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा वाद

# शिष्टमंडळ घेऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची भेट घेणार : पाटील

अक्कलकोट :-(प्रतिनिधी):- महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा वादावर संयम बाळगा लवकरच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शिष्टमंडळ घेऊन मंत्रालय स्तरावर बैठक लावण्याचा निर्धार माजी आ.सिद्रामप्पा पाटील यांनी केले.

महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादावर अक्कलकोट तालुक्यातील जनतेच्या भावना तीव्र झाल्याने त्याचंमनस्थितीत काही गावच्या सरपंचांनी कर्नाटक मध्ये जाण्याचा निर्णय घेतला होता याच पार्श्वभूमीवर गुरुवारी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तडवळ येथील शासकिय विश्राम ग्रह येथे बैठक आयोजित करण्यात आला होता.

माजी उपसभापती प्रकाश हिप्परगी, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील, शिवयोगी स्वामी, निलप्पा विजापूरे, शिवसिध्द बुळ्ळा, सुरेश झळकी, विवेकानंद उंबरजे, बाबुशा कोरपे, सिध्दाप्पा गड्डी, श्रीशैल करजगी, निजमुद्दिन बिराजदार, बाबू सुतार, पिरोजी शिंगाडे, रविकांत बगले, देविदास



कोळेकर, नागनाथ पाटील, आपासाहेब बिराजदार यांच्यासह सरपंच महांतेश हत्तुरे महादेव मुडवे, बसवराज बोळेगाव आदींची यावेळी उपस्थिती होती. दरम्यान तडवळ परिसरातील सुमारे १८ ते २० गावांनी कर्नाटक मध्ये जाण्याचा निर्धार करून तशा प्रकारचा ठराव केल्याने सर्वत्र हा विषय उफाळून आला आहे. या बैठकीत सर्वांच्या भावना लक्षात घेता लवकरच आ. सचिन कल्याण शेट्टी यांच्या समवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बैठक लावून प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार म पाटील यांनी या बैठकी प्रसंगी बोलताना दिला.. शिवानंद पाटील, माजी उपसभापती प्रकाश हिप्परगी यांनीही बैठक लावून प्रश्न मार्गी लावू असे याप्रसंगी बोलताना म्हणाले.. याप्रसंगी आळगेचे सरपंच महांतेश हत्तुरे यांनी आमच्यावर आज पर्यंत झालेला अन्याय जोपर्यंत दूर होणार नाही तोपर्यंत आपली भूमिका कायम असल्याची त्यांनी यावेळी स्पष्ट केला.



✔ सुराज्य/नवी दिल्ली

**महाराष्ट्र-कर्नाटक वाद मागील काही दिवसांपासून उफाळून आला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगली आणि सोलापुरातील काही गावांवर दावा सांगितला होता. बोम्मई यांच्या दाव्यानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. त्यातच महाराष्ट्रातील ट्रकवर बेळगावात हल्ला करण्यात आला होता. यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट गृहमंत्री अमित शाह यांना फोन करून चर्चा केली होती. मात्र, यानंतरही मुख्यमंत्री बोम्मई यांनी आडमुठेपणाची भूमिका घेतल्याचे दिसत आहे.**

# महाराष्ट्राला एक इंचही जागा देणार नाही

## बोम्मईंनी पुन्हा डिवचलं; फडणवीसांचा उल्लेख करताच अमित शाहांशी संतापून म्हणाले

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी हा वाद सोडवण्यासाठी गृहमंत्री शाह यांच्याकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे, याबाबत माध्यम प्रतिनिधींनी बोम्मईंनी विचारले असता ते संतापले व म्हणाले, कर्नाटक-महाराष्ट्र सीमावादावरून भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशी बोलणे झाले आहे.

कर्नाटक महाराष्ट्राला एक इंचही जागा देणार नाही. तसेच, याप्रकरणात कोणतीही तडजोड करणार नाही. तसेच अमित शाहांबरोबर सीमाप्रश्नावरून कोणतीही चर्चा झाली नाही, असे ठामपणे बोम्मईंनी सांगितलं.

नड्डा यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना फोन करून शांतता राखण्यास सांगितले आहे, अशी माहिती देत बोम्मई यांनी म्हटले, 'महाराष्ट्रात असलेल्या कन्नडिगांचे संरक्षण करण्याबाबत सर्व खबरदारी घेण्यात आली आहे. याबाबत राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुख्य सचिव यांच्याशी चर्चा केली आहे, असेही बोम्मई यांनी सांगितले.

### फडणवीसांची अमित शाहांशी काय चर्चा?

बेळगावात महाराष्ट्रातील ट्रकवर दगडफेक झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाहांना फोन केला होता. अमित शाहांनी फोनवरून चर्चा करून, सर्व परिस्थिती मांडली. विनाकारण महाराष्ट्रातल्या गाड्यांवर हल्ला होणे योग्य नाही, हे लक्षात आणून दिले. मी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी बोललो, त्यांनी मला आश्वासित केले की हल्ले होणार नाही. मी गृहमंत्र्यांना विनंती केली आहे, की, त्यांनीही यामध्ये लक्ष घालावे आणि तिकडच्या मुख्यमंत्र्यांना स्पष्टपणे सांगावे की अशाप्रकारे दोन्ही राज्यांमध्ये एकमेकांच्या गाड्यांवर हल्ले होणे अतिशय चुकीचे आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली होती.

## राज्यात तीस हजार टन बेदाणा शिल्लक

✔ **सुराज्य/पुणे** : राज्यात सांगली, सोलापूर परिसरात मागील हंगामातील सुमारे तीस हजार टन बेदाणा शिल्लक आहे. नवा बेदाणा फेब्रुवारी माहिन्यात बाजारात येईल, तोपर्यंत हा बेदाणा संपून जाईल. मागील महिनाभरापासून बेदाण्याच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यामुळे दरातही सुमारे वीस रुपयांपर्यंत तेजी आली आहे, अशी माहिती बेदाणा उद्योगातील जाणकारांनी दिली.

सांगली, सोलापूर, पुणे हे राज्यातील प्रमुख बेदाणा उत्पादक जिल्हे आहेत. मागील हंगामात राज्यात सुमारे १ लाख ८० हजार टन बेदाण्याचे उत्पादन झाले होते. हंगामाच्या सुरुवातीपासूनच चांगल्या बेदाण्याला २०० ते २१५ रुपयांपर्यंत दर मिळाले होते. दिवाळीपर्यंत सुमारे दीड लाख टनांची विक्री झाली आहे. सध्या राज्यातील शीतगृहात सुमारे ३० हजार टन बेदाणा शिल्लक आहे; पण हा बेदाणा फेब्रुवारी महिन्यापर्यंत संपण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीत बाजारात येणाऱ्या नव्या बेदाण्यावर त्याचा कोणताही दबाव असणार नाही.

## पंतप्रधानांच्या घोषणेतील वचन पाळणे बंधनकारक नाही

### ▶ नोटाबंदीतील सुनावणीत रिझर्व्ह बँकेच्या वकिलांचा दावा

✔ सुराज्य/मुंबई

**नोटाबंदीची घोषणा करताना पंतप्रधानांनी जुन्या नोटा बदलून घेण्यासाठी मुदत वाढवण्याची घोषणा केली असली तरी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार ते पाळणे सरकार किंवा रिझर्व्ह बँकेसाठी बंधनकारक नाही, असा दावा वरिष्ठ विधिज्ञ जयदीप गुप्ता यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात केला.**

कायदेशीर निर्देशांचे पालन नागरिकांनी केले तर त्यांचे पैसे त्यांच्याकडेच राहतील, असे नोटबंदी जाहीर करण्यापूर्वी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी म्हटले होते. त्यांनी भाषणात नोटा बदलण्यासाठी ५० दिवसांच्या मुदतीचाही उल्लेख केला होता, परंतु त्यांनी आणखी मुदत देण्यात येईल, असे जाहीर केले नव्हते. परंतु त्यांनी जरी तसे म्हटले असते तरी, वचनपूर्तीच्या कारणास्तव मुदत वाढविता येत नाही आणि अधिसूचनेनुसार ते बंधनकारकही नाही,'' असे अ‍ॅड. गुप्ता यांनी घटनापीठापुढे सांगितले.





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी देशाला उद्देशून भाषण केले. त्यात ते म्हणाले होते की, 'जे लोक ३० डिसेंबर रोजी कोणत्याही कारणास्तव जुन्या नोटा जमा करू शकणार नाहीत, त्यांना नियुक्त केलेल्या बँकांमध्ये नोटा बदलण्याची परवानगी दिली जाईल आणि ते पुढल्यावर्षी (२०१७) ३१ मार्चपर्यंत नोटा जमा करू शकतात.' २०१६ च्या नोव्हेंबरमध्ये ५०० आणि एक हजार रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या ५८ याचिकांवर न्यायमूर्ती एस. अब्दुल नजीर, न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती ए. एस. बोपण्णा, न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यम आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न यांच्या घटनापीठात सुनावणी झाली. बुधवारी सहा दिवसांच्या दीर्घ सुनावणीनंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे.



## मुख्यमंत्रीपदाची माळ कुणाच्या गळ्यात?

✔ सुराज्य/शिमला

हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवलेल्या काँग्रेस पक्षाकडून मुख्यमंत्रीपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याविषयी तर्क लावले जात आहेत.

प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंह, निवडणूक प्रबंधन समितीचे अध्यक्ष सुखविंदर सिंह सुक्खू आणि ज्येष्ठ नेते मुकेश अग्निहोत्री यांच्यात मुख्यमंत्रीपदासाठी चुरस आहे. कौलसिंह ठाकूर, रामलाल ठाकूर आणि आशाकुमार हे नेतेही मुख्यमंत्रीपदाचे दावेदार मानले जात होते, मात्र या तिघांचाही निवडणुकीत पराभव झाला आहे.

माजी मुख्यमंत्री दिवंगत विरभद्र सिंह यांची पत्नी प्रतिभा सिंह या मुख्यमंत्रीपदाच्या प्रबळ दावेदार मानल्या जात आहेत. राज्यातील वरिष्ठ नेते सुक्खू यांना मुख्यपत्रीपदी बसविण्याच्या विरोधात आहेत. प्रतिभा सिंह याच त्यांची पहिली पसंती असल्याचे बोलले जात आहे. मात्र, त्या खासदार असल्याने मुख्यमंत्री झाल्यास त्यांना पुन्हा निवडून यावे लागेल. विधानसभेत विरोधी पक्षनेते असलेले मुकेश अग्निहोत्री सलग पाच वेळा निवडून आले आहेत. तेही मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. ते मुख्यमंत्री झाल्यास ऊना जिल्ह्याला पहिला मुख्यमंत्री मिळेल. कांगडा जिल्ह्यातही काँग्रेसला अधिक जागा मिळाल्या असल्याने या जिल्ह्यातील सुधीर शर्मा आणि माजी खासदार चंद्रकुमार यांचेही नावे मुख्यमंत्रीपदासाठी चर्चेत आहेत.

## २१ वर्षांत १८ हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या

✔ सुराज्य/पुणे

**शेतकरी आत्महत्या थांबाव्यात याकरता सरकारी पातळीवर प्रयत्न केले जात असले तरीही दरवर्षी आत्महत्यांची येणारी आकडेवारी चिंता वाढवणारी असते. २००१ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची नोंद सरकारी दप्तरी ठेवण्यात येत आहे. त्यानुसार, गेल्या २१ वर्षांत पश्चिम विदर्भात तब्बल १८ हजार ५९५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून फक्त निम्म्या शेतकरी कुटुंबांनाच सरकारी मदत मिळाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

गेल्या काही वर्षांपासून सातत्याने अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंतेत आहे. पर्यावरणीय बदलांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनातही घट झाली आहे. त्यामुळे शेतीमालाच्या विक्रीतून शेतकऱ्यांचा खर्चही निघत नाही. शिवाय कर्जाचा डोंगर, खते आणि किटकनाशकांचा अतिरिक्त खर्च, शेतीमालाला योग्य भाव न मिळणे आदी कारणांमुळे शेतकरी तणावात आहेत. २००१ मध्ये अमरावतीत ४९ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली होती.

२००६ मध्ये पश्चिम विदर्भात सर्वाधिक म्हणजे १२९५ आत्महत्यांची नोंद झाली होती. तर, गेल्या वर्षी अमरावतीत ११७९ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले होते. यंदाचा आकडा त्यापेक्षा जास्त असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येतेय.

## मंत्रिमंडळ विस्तारासाठी २६ जानेवारीपूर्वीचा मुहूर्त

✔ सुराज्य/मुंबई

**राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर जवळपास ४० दिवसांनी मंत्रिमंडळ विस्तार झाला. आता दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पण एकूण परिस्थिती पाहता, हा मंत्रिमंडळ विस्तार नव्या वर्षात २६ जानेवारीपूर्वी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

राज्यात विधान परिषद निवडणुकीनंतर अतिशय वेगात नाट्यमय घडामोडी घडल्या. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या ३९ आणि अन्य १० आमदारांनी बंडाचे निशाण फडकावले. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास



आघाडीच्या सरकारला २९ जूनला पायउतार व्हावे लागले. लगेच दुसऱ्या दिवशी ३० जूनला मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर जवळपास ३९ दिवसांनी मंत्रिमंडळ विस्तार झाला. यात भाजपा आणि शिंदे गटाचे प्रत्येकी आठ मंत्री आहेत.

त्यातच दुसरीकडे हा सत्तासंघर्ष सर्वोच्च न्यायालयाच्या दरवाजापर्यंत पोहोचला आहे. विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. १६ आमदारांच्या अपात्रतेची याचिका (ठाकरे गटाकडून), विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव (शिंदे गटाकडून) यासह आणखी चार याचिकांवर सर्वांत आधी २१ जुलै रोजी सुनावणी झाली होती. तर, शेवटची सुनावणी १ नोव्हेंबर रोजी झाली होती. दोन्ही याचिकाकर्त्यांनी तीन आठवड्यांत संयुक्तपणे लिखित बाजू मांडण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालायने दिले होते. त्यानुसार २९ नोव्हेंबर रोजी सुनावणी झालीच नाही. आता ही सुनवाणी थेट पुढच्या वर्षांत म्हणजे १३ जानेवारी २०२३ रोजी होणार आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्ताराचा लांबलेला हा दुसरा टप्पा २६ जानेवारीपूर्वी होईल, अशी शक्यता राजकीय वर्तुळात वर्तविली जात आहे.

## ..तर आज श्रद्धा जिवंत असती; चौकशीची मागणी

✔ सुराज्य/मुंबई



**श्रद्धाच्या मृत्यूचे आम्हांला दु:ख आहे. आम्ही आमचे दु:ख कधीच विसरू शकणार नाही. आम्हांला न्याय मिळेल, असा शब्द दिल्ली पोलिसांनी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.**

श्रद्धाला अतिशय क्रूरपणे संपवणाऱ्या आफताब पुनावाला कठोर शिक्षा व्हावी. त्याच्या कुटुंबियांची चौकशी व्हावी. ते दोषी आढळल्यास त्यांनाही शासन व्हावे, अशी आशा श्रद्धाचे वडील विकास वालकर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे नेते किरीट सोमय्यांची भेट घेतल्यानंतर विकास वालकर यांनी पत्रकार परिषद घेतली. दिल्ली पोलिसांच्या तपासाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.


श्रद्धाच्या गुन्हेगारांना कठोर शासन होईल, असा शब्द फडणवीसांना दिल्याचे वालकर यांनी सांगितले. दिल्ली पोलीस आणि वसई पोलीस संयुक्तपणे गुन्ह्याचा तपास करत आहेत. न्यायालयावर, न्याय व्यवस्थेवर माझा विश्वास असल्याचे वालकर म्हणाले.

## अमेरिकेत पुन्हा भारतीयांचा डंका

### सुष्मिता शुक्ला फेड रिझर्व्ह बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी

✔ सुराज्य/न्यूयॉर्क

**जागतिक आणखी एका मानाच्या पदावर भारतीय व्यक्ती विराजमान झाली आहे. भारतीय वंशाची सुष्मिता शुक्ला यांची न्यूयॉर्कच्या फेडरल रिझर्व्ह बँकेच्या प्रथम उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अशाप्रकारे सुशीला आता या प्रतिष्ठित सेंट्रल बँकेची दुसरी सर्वोच्च अधिकारी बनली आहे. न्यूयॉर्कस्थित सेंट्रल बँकेने निवेदन जाहीर केले आणि म्हटले की, शुक्ला यांच्या नियुक्तीला फेडरल रिझर्व्ह सिस्टमच्या संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. ५४ वर्षीय शुक्ला मार्च २०२३ पासून बँकेतील पदभार सांभाळतील.**



न्यूयॉर्क फेडसारख्या संस्थेसाठी काम करण्याची संधी मिळाल्याचा मला सन्मान वाटतो, असे शुक्ला यांनी एका निवेदनात म्हटले आहे. 'माझ्या कारकिर्दीत मी शिकलेल्या प्रत्येक गोष्टींचा उपयोग करेन, ज्यात माझे तंत्रज्ञान, ऑपरेशन्स आणि जोखीम-केंद्रित अनुभव यांचा समावेश आहे, या महत्त्वाच्या उपक्रमांना पुढे नेण्यासाठी आणि या महत्त्वाच्या संस्थेच्या समर्पित नेतृत्वाला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी पुढे सांगितले.'



## पंजाब नॅशनल बँक कस्टमर केअरच्या नावाखाली गंडा

✔ सुराज्य/मुंबई

पंजाब नॅशनल बँकेच्या ग्राहक सेवा कक्षातून बोलत असल्याचे सांगून खात्याची माहिती घेऊन महिलेला सुमारे सव्वा लाख रुपयांना गंडा घालण्यात आला. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हर्षवर्धन जाधवांची तब्येत बिघडली, आगामी निवडणुका कोणाच्या नेतृत्वात?

✔ सुराज्य/औरंगाबाद : कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी लेकाला आपला राजकीय वारसदार घोषित केले आहे. आदित्य यांच्या नेतृत्वात आगामी सर्व निवडणुका लढवण्याची घोषणा जाधवांनी फेसबुक व्हिडिओद्वार केली. हर्षवर्धन यांची तब्येत बिघडल्याने ते काही काळ विश्रांती घेणार आहत. आपल्याला आता राजकारणात काही नको, पण तुम्हांला हवा असणारा आमदार माझा मुलगा आदित्यच्या रुपाने जाधव कुटुंब तुम्हांला २०२९ मध्ये देईल, अशी घोषणा त्यांनी नुकतीच सोशल मीडियावरुन केली होती.



## कराडांवर मोठी जबाबदारी

### ▶ बालेकिल्ला भेदण्यासाठी खास मिशन

✔ सुराज्य/परभणी

**पक्षांतर्गतच्या कुरघोडी राजकारणात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. भागवत कराड यांना राज्यसभेची उमेदवारी देऊन थेट केंद्रामध्ये केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पदावर बसवले. यामागचा मुख्य उद्देश आहे की, पंकजा मुंडे यांचे राजकीय वजन कमी करणे. मात्र, आता याच भागवत कराड यांना भाजपाकडून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये तीस वर्षापासून शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या परभणीमध्ये भाजपाचा खासदार निवडून आणण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. असे असले तरी परभणीमध्ये भाजपामध्ये असलेल्या गट तटाच्या राजकारणामुळे भागवत कराड यांच्या अडचणीत वाढ होणार आहे.तर परभणी लोकसभा मतदारसंघावर पंकजा मुंडे यांचा प्रभाव असल्याने भागवत कराड शिवसेनेचा बालेकिल्ला भेदणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मी जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहे, असे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केल्यानंतर भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पक्षांतर्गत कुरघोडी राजकारणात पंकजा मुंडे यांचे राजकीय वजन कमी करण्यासाठी वंजारी समाजाचा चेहरा असणारे भागवत कराड यांना राज्यसभेची उमेदवारी देऊन आपली पहिली खेळी खेळली. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्तारामध्ये पंकजा मुंडे यांच्या बहीण खासदार प्रीतम मुंडे यांची



मंत्रिमंडळात वर्णी लागेल, असे बोलले जात असताना खासदार डॉ. भागवत कराड यांना केंद्रीय अर्थ राज्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

आता याच भागवत कराड यांच्यावर तीस वर्षापासूनच शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या परभणी लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजपाचा उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मात्र, परभणी लोकसभा मतदारसंघातील गंगाखेड, जिंतूर पाथरी घनसावंगी परतुर आणि परभणी लोकसभा मतदारसंघांमध्ये पंकजा मुंडे यांचा थेट प्रभाव आहे तर दुसरीकडे परभणी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये भाजपामध्ये गटातटाचे राजकारण आहे.

भाजपाच्या एका बैठकीमध्ये दोन जिल्हाध्यक्ष एकमेकांच्या अंगावर मारण्यासाठी गेल्याचे देखील या अगोदर परभणी जिल्ह्याने पाहिले आहे.

असे असताना देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड पक्षात अंतर्गत असलेली गटबाजी संपवून पंकजा मुंडे यांचा परभणी लोकसभा मतदारसंघावर थेट प्रभाव असताना आणि परभणी हा शिवसेनेचा बालेकिल्ला मागील ३० वर्षापासून असल्यामुळे या ठिकाणी आपली जादू कशी चालवणार असाच प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

या मतदारसंघांमध्ये भाजपाचा उमेदवार निवडून आणण्यासाठी केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांना मोठी कसरत करावी लागणार आहे.

## राज्यात ३ हजार ६२८ पदे निर्माण करण्यात येणार

✔ सुराज्य/मुंबई

गेल्या काही वर्षांपासून राज्यात तलाठी पदाच्या अनेक जागा रिक्त होत्या. एकाच तलाठ्याकडे अनेक गावे सोपविण्यात आल्याने कामांना विलंब व्हायचा आणि महसूल यंत्रणेवर ताण येत होता. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी पदोन्नती प्रक्रियेला गती मिळावी यासाठी पुढाकार घेतला होता. येत्या काही दिवसांमध्ये तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी पदोन्नती प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. ३ हजार ११० तलाठी आणि ५१८ मंडळ अधिकारी असे एकूण ३ हजार ६२८ पदे निर्माण करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी सांगितले.

गावात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तींचा तलाठी याच्याशी संबंध येत असतो. सातबारा, विविध दाखले यासाठी नियमितपणे तलाठी यांच्या संपर्कात राहावे लागते.तलाठी हे पद ग्रामीण भागात अत्यंत महत्वाचे असते. आता होणाऱ्या तलाठी भरतीमुळे सध्या कार्यरत असलेल्या तलाठी वर्गाचा भार कमी होण्यास मदत होणार आहे.

तलाठी साझा पुनर्रचनेनुसार विहित केलेल्या निकषाच्या अनुषंगाने संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडून महसूली विभागनिहाय प्राप्त माहितीस अनुसरुन वाटप करण्यात आलेल्या ३ हजार ११० साझे आणि ५१८ महसूली मंडळ कार्यालयासाठी ३ हजार ११० तलाठी भरती आणि ५१८ मंडळ अधिकारी यांची पदोन्नती असे एकूण ३ हजार ६२८ पदे निर्मितीला मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय ७ डिसेंबर २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

पुणे महसूली विभागाअंतर्गत एकूण ६०२ तलाठी साझे आणि १०० महसूली मंडळे आहेत. अमरावती महसूली विभागाअंतर्गत एकूण १०६ तलाठी साझे आणि १८ महसूली मंडळे आहेत. नागपूर महसूली विभागाअंतर्गत एकूण ४७८ तलाठी साझे आणि ८० महसूली मंडळे आहेत. औरंगाबाद महसूली विभागाअंतर्गत एकूण ६८५ तलाठी साझे आणि ११४ महसूली मंडळे आहेत. नाशिक महसूली विभागाअंतर्गत एकूण ६८९ तलाठी साझे आणि ११५ महसूली मंडळे आहेत.

# महापालिकेच्या वसुली धडक मोहिमेने थकबाकीदारांना भरली हुडहुडी

## तीन शिक्षण संस्थांच्या कार्यालयासह खादी ग्रामोद्योगचे गाळे सील; अडीच कोटींची वसुली

सुराज्य/सोलापूर

तीन शिक्षण संस्था कार्यालयासह खादी ग्रामोद्योगची गाळे शुक्रवारी महापालिकेच्या कर वसुली विशेष पथकाने सील केली आहेत. दरम्यान, नोटिसा बजावलेल्या बड्या थकबाकीदारांसह दैनंदिन असे एकूण २ कोटी ६७ लाखांपेक्षा जास्त वसुली करण्यात आली आहे.

सोलापूर महापालिका कर संकलन विभागाच्या विशेष पथकाकडून शुक्रवारी दुसऱ्या दिवशीही बड्या मिळकत कर थकबाकीदारांवर सील ठोक कारवाई करण्यात आली. दुसऱ्या दिवशी शहरातील विविध तीन शिक्षण संस्थांची कार्यालय सील करण्यात आली तर पार्क स्टेडियम येथील खादी ग्रामोद्योग संघाचे चार गाळे सील करण्यात आले आहेत. यामध्ये ३४ लाख रुपये मिळकत कर थकबाकी असलेल्या बंदेनवाज शेख यांची अहिल्यादेवी शाळा, १२.५८ लाख रुपये थकबाकीदार असलेल्या सुमय्या शिक्षण विकास मंडळाची मराठी व उर्दू शाळा, २०.५३ लाख रुपयांची थकबाकी असल्याने ताजोद्दीन मेनोद्दीन शेख यांची शाळा कार्यालय सील करण्यात आले आहे. पार्क स्टेडियम येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर खादी ग्रामोद्योग महामंडळ या संस्थेची चार गाळे तब्बल एक कोटी सात लाख रुपये मिळकत कर थकबाकी असल्याने सील करण्यात आली आहेत.



यापूर्वीच या बड्या थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यानंतर अखेर गुरूवारपासून महापालिका प्रशासनाने विशेष पथकाच्या माध्यमातून सील ठोक कारवाई हाती घेतली आहे. दुसऱ्या दिवशी नोटीसा बजावण्यात आलेल्या या १४ बड्या थकबाकीदारांनी सील ठोक कारवाई टाळण्यासाठी २ कोटी ६७ लाखांचा लाख रुपये भरणा केला आहे. महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या नियंत्रणाखाली कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांच्यासह विशेष पथकाने ही कारवाईची मोहीम राबविली आहे.

### सुट्टी दिवशीही कारवाई सुरूच राहणार

सोलापूर महापालिकेच्या विशेष पथकाकडून शनिवारी सुट्टी दिवशीही बड्या थकबाकीदारांच्या कर वसुलीसाठी सील ठोक कारवाई सुरूच राहणार आहे. त्याचबरोबर नागरिकांसाठी महापालिकेची कर संकलन केंद्र मिळकत कर भरण्यासाठी सुरू ठेवण्यात येणार असल्याचे कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी सांगितले.

### यांनी भरला कर

मार्केट यार्ड- ३ लाख ६१ हजार, चंद्रशेखर कोमाफूल कारखाना २ लाख ११ हजार, कनाळे एडीएफसी- ७ लाख २१ हजार, गीताबाई चिप्पा- १ लाख ५५ हजार, सोजवा सुधीर राऊत, शुभदा राऊत- २ लाख ५१ हजार, कादरी हॉस्पिटल २ लाख ६८ हजार, मंजूर पटेल- ८५ हजार, इम्तियाज काझी- ३ लाख ४० हजार, सुजाता आडम - २ लाख ५९ हजार, कमरूननिसा शेख- २२ हजार

## रिक्षाची दुचाकीला धडक; एकाचा मृत्यू

सोलापूर : रिक्षा मोटरसायकलच्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना ६ रोजी दुपारी तीनच्या दरम्यान जुना टीव्ही केंद्र न्यायाधीश निवासस्थान जवळ घडली. याप्रकरणी सैफन मौला शेख (वय-२५,रा.शोभादेवी नगर, टिपू सुलतान चौक, नई जिंदगी) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सिकंदर निसास नदाफ (रा.कुर्बान हुसेन नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वरील संशयित आरोपीने हा त्याच्या ताब्यातील रिक्षा (एम.एच.१३.बीवी.०५७८) अतिवेगाने चालवत दुचाकीला धडकवली. यात फिर्यादी व फिर्यादी यांचा मित्र यांना गंभीर दुखापत झाली. तसेच फिर्यादी यांचा मित्र म.गौस हुसेनबाशा जहागीरदार यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे, असे फिर्यादीत नमुद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.



## चेतन नरोटे यांचे जंगी स्वागत

सुराज्य/सोलापूर

सोलापुर शहर काँग्रेस कमिटीच्या नूतन अध्यक्षपदी चेतन नरोटे यांची निवड करण्यात आहे.निवडीनंतर नरोटे यांचे आज सोलापुरात आगमन झाले.

छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथे सोलापुर शहर काँग्रेस कमिटी पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच चेतन नरोटे मित्रपरिवाराच्या वतीने ढोल ताशाच्या गजरात, हलगीच्या दणदणाटात स्वागत केले. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्षा आमदार प्रणिती शिंदे यांच्या शिफ़ारसीनुसार सोलापुर शहर काँग्रेस कमिटीच्या नूतन अध्यक्षपदी चेतन नरोटे यांची निवड करण्यात आली.

त्यांचे निवडीचे पत्र ८ डिसेंबर रथे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते देण्यात होते. त्यानंतर नरोटे यांचे आगमन झाले आहे. आगमन होताच जल्लोषात स्वागत करण्यात आले ढोल ताशा गुलालाची उधळण करण्यात आली नरोटे यांनी शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांनी काँग्रेस भवन ला भेट दिली यावेळी माजी अध्यक्ष प्रकाश वाले, माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## सराफांना गंडा घालून पळून गेलेल्या तीन आरोपींना अटक

### जोडभावी पेठ पोलीस ठाण्याची कामगिरी

सुराज्य/सोलापूर

शहरातील तीन सरांफाना गंडा घालून ३१८ ग्रॅम सोने घेऊन पसार झालेल्या पश्चिम बंगालच्या तिघा सोने कारागिरांना जोडभावी पेठ पोलिसांनी जेरबंद केले असून त्यांच्याकडून सव्वाशे ग्राम सोन्याची लगड हस्तगत केल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त संतोष गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुख्य आरोपी सफराज सल्लाउद्दीन काझी (वय २५), अरसूद्दीन काझी (वय २४), एजाज काझी (वय २२, सर्व रा फुरफुरा शरीफ, पश्चिम बंगाल) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. फिर्यादी आसिफ बशीर शेख (वय ३७, रा. हाजी हजरत खान चाळ) यांचे आरमान ज्वेलर्स नावाचे सराफ बाजार येथे दुकान असून त्यांच्याकडे सोन्याचे दागिने बनविण्याचे काम सर्फराज हा करीत होता. त्याने त्यांच्याकडून अकरा लाख सात हजार रुपयांची २१३ ग्रॅम सोन्याची लगड तसेच अन्य दोन व्यापाऱ्यांकडून सव्वा पाच लाख रुपयांची १०५ ग्रॅमची सोन्याची लगड दागिने बनवून देण्याकरिता घेतली होती, परंतु तो दागिने न बनवता पसार झाला होता. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. याचा तपास करताना पोलिसांनी सरफराज संपर्कात असलेल्या संशयित व्यक्तीचा मोबाईल नंबर मिळवला आणि तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांचे पथक बेळगाव जिल्ह्यातील अथणी येथून अरसुद्दीन याला व हुबळी येथून एजाज याला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे पोलिसांनी सखोल तपास करून सरफराज वापरत असलेला मोबाईल नंबर मिळवला आणि तांत्रिक माहितीच्या आधारे त्याचे लोकेशन मिळवून पथक उत्तर प्रदेशातील मेरठ येथे गेले. पोलिसांनी सहा दिवस तेथे मुक्काम करून आरोपी सर्फराज याला बेड्या ठोकल्या. आरोपींची सखोल चौकशी केल्यानंतर त्याने सोन्याची लगड पश्चिम बंगाल येथे ठेवल्याची कबुली दिली. त्यानुसार त्याचा सोलापुरातील काका सय्यद याने तेथे जाऊन सव्वाशे ग्रॅमची सोन्याची लगड आणून पोलिसांसमोर हजर केली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत, फौजदार संजीवनी व्हट्टे, पोलिस अंमलदार स्वामी, जमादार, लिगाडे, गायकवाड शेळकंदे, शेख, बागलकोटे यांनी केली.



### दहा तोळे सोने हस्तगत

वडिलांचे गहाणखत असलेले शेत सोडवून घेण्याचा बहाना करून १५ तोळ्यांचे सोन्याचे दागिने घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या अनिता उर्फ राजेश्वरी सिद्धेश्वर स्वामी (रा. सूत मिलजवळ, अक्कलकोट रस्ता) हिला ताब्यात घेऊन तिच्याकडून पोलिसांनी दहा तोळ्यांचे सोने हस्तगत केले आहे.

## दलित वस्ती सुधारणेचा ३ कोटींचा अखर्चित निधी शासनाकडे परत जाणार

सुराज्य/सोलापूर

महापालिकेला अण्णाभाऊ साठे योजनेंतर्गत दलित वस्ती सुधारणांसाठी सन २०१४ ते २०१७ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या निधींपैकी अखर्चित ३ कोटी रुपये निधी शासनाकडे परत जाणार आहेत. ज्या कामांसाठी शासनाकडून ही रक्कम महापालिकेला मिळाली होती, ती कामे झाल्याने नियमानुसार प्रशासनाकडून निधी शासनाकडे वर्ग केला जात आहे.



प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांमध्ये निधी खर्ची टाकण्यावरून एकमत होत नसल्याने विकास कामे प्रलंबित राहतात अथवा कामे मुदतीत पूर्ण होत नाही. राजकीय कुरघोड्यांमुळे शहरातील विकास कामांना ब्रेक लागले आहेत. त्यामुळे अनेक योजनांतील अखर्चित शासनाकडे परत करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे. २०१४ ते २०१७ या तीन वर्षाच्या कार्यकाळात अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या एकूण रक्कमेपैकी ३ कोटी रुपये अखर्चित आहे. हा निधी खर्च करण्याची मुदत आणि कामेदेखील पूर्ण झाल्याने हा निधी शासनाकडे परत पाठविण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### ■ शासन निर्णयानुसार रक्कम पाठवावी लागणार: आयुक्त

ठराविक योजनेतील रक्कम ही ठराविक कामांसाठी प्राप्त झालेली असते. ती कामे पूर्ण झाली तर तो निधी इतरत्र वळविता येत नाही. सोलापूरच नव्हे तर राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अखर्चित निधी शासनाकडे परत करण्याचे सूचना आहेत. त्यानुसार ही ३ कोटी रक्कम शासनाकडे परत पाठवावे लागणार आहे, असे पालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.

### ■ ३ वर्षात ३.०४ कोटींचा निधी अखर्चित

एकूण तीन वर्षात या योजनेअंतर्गत शासनाकडून २७.११ कोटी रुपये निधी प्राप्त झाला यामध्ये २३० कामांचा समावेश होता तर १७ कामे रद्द करण्यात आली या तीन वर्षात एकूण ३.०४ कोटी रुपये निधी शिल्लक अखर्चित राहिला. सन २०१४ १५ या आर्थिक वर्षात ७.३ कोटी निधी प्राप्त झाला ५९ कामे यांचा समावेश होता तर पाच कामे रद्द केली या वर्षात १.१५ कोटी रुपये निधी शिल्लक राहिला सन २०१५ १६ या वर्षात ९ कोटीचा निधी प्राप्त झाला ९५ कामांचा समावेश होता १.२ कोटी निधी अखर्चित राहिला होता तर सन २०१६ १७ मध्ये १०. ८१ कोटी रुपये निधी प्राप्त झाला होता यामध्ये ७६ कामे होती तर ५९ लाख रुपये निधी अखर्चित राहिला होता.

## सोलापुरात उद्या गुरव समाजाचे महाअधिवेशन

### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार उद्‌घाटन

सोलापूर : राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या वतीने गुरव समाजाचे महाअधिवेशन रविवार दि.११ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता डि.एड्‌ कॉलेज मैदान नेहरु नगर विजापूर रोड येथे होणार आहे. या अधिवेशनाच्या उद्‌घाटनास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असल्याची माहिती स्वागत समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



ह.भ.प.अध्यात्म विवेकी गुरुवर्य ज्ञानेश्वर विष्णु महाराज (कोल्हापूर) यांच्या दिव्य सानिध्यात होणाऱ्या अधिवशेनास केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कर्नाटकचे जलसंपदा मंत्री गोविंद एम. कारजोळ, शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर, आरोग्य मंत्री तानाजी सावंत, सहकार मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर, खा.ओमराजे निंबाळकर, आ. विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी, आमदार प्रणिती शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आजी - माजी आमदारांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या महा अधिवेशनामध्ये विविध ९ ठराव करून ते राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत. गुरव समाजातील मान्यवरांचाही यावेळी सन्मान करण्यात येणार असल्याचे माजी आमदार विजयराज शिंदे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन गुरव, बाळासाहेब शिरसागर, यशवंत ढेपे, चंद्रकांत गुरव, देवेंद्र औटी, सुनील गुरव आदी उपस्थित होते.

## चिमणी प्रकरण : तांत्रिक मुद्दे तपासण्याचे काम सुरू

सोलापूर : सिद्धेश्वर कारखान्याच्या चिमणी प्रकरणाची अंतिम सुनावणी पूर्ण करून आयुक्तांनी निर्णय राखून ठेवला आहे. तांत्रिक मुद्दे तपासणीचे काम सुरू असून ते झाल्यावर निर्णय देणार असल्याची माहिती पालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी दिली.

गेली सहा महिने विमान प्राधिकरणाच्या अहवालाच्या प्रतीक्षेत महापालिकेतील चिमणी सुनावणीला तारीख पे तारीख मिळत होती. साखर कारखान्याच्या अनधिकृत चिमणीबाबत महापालिकेच्या वतीने नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांच्यासमोर ५ रोजी सुनावणी झाली. नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार कारखान्याला म्हणणे मांडण्यासाठी तारीख दिली होती. कारखान्याचे संचालक धर्मराज काडादी यांनी सुनावणीत अंतिम लेखी म्हणणे सादर केले. यानंतर आपले काहीही म्हणणे नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आयुक्त शीतल तेली उगले यांनी सुनावणी क्लोज करून अंतिम निर्णय मात्र राखून ठेवला आहे. आता आयुक्त काय आदेश देणार याची उत्सुकता लागली आहे. याप्रकरणात तांत्रिक मुद्द्यांची माहिती घेऊन ते तपासणीचे काम सुरू आहे, त्यानंतर चिमणीबाबत निकाल दिला जाईल, असे आयुक्त शीतल तेली उगले यांनी सांगितले.

## 'रघोजी'मध्ये किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रियेस मान्यता


सोलापूर : रघोजी किडनी आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया, हृदयाची शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) व मेंदुचे शस्त्रक्रिया विभाग सुरु करण्यात आल्याची माहिती डॉ. विजय रघोजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२००३ मध्ये सुरू झालेल्या रघोजी किडनी हॉस्पिटलचे २०१९ मधे होटगी रोड येथे भव्य १०० बेड चे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रूपांतर झाले. या नूतन हॉस्पिटलच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त नुकतेच या रुग्णालयास किडनी ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया करण्यास मान्यता मिळाली आहे. बायपास शस्त्रक्रिया, मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक मायक्रोस्कोप तसेच पोटाचे बिनटाक्याचे उपचार करण्यासाठी विविध दुर्बिणी पण उपलब्ध आहेत. बऱ्याच शस्त्रक्रियेसाठी शासकिय मोफत योजना पण उपलब्ध आहेत, असे डॉ. रघोजी यांनी सांगितले. यावेळी गजानन पिंगुरवार, डॉ. संध्या रघोजी, डॉ. निहारिका पिंगुरवार, सुनीलकुमार आदी उपस्थित होते.

## हजारो सह्या करून सुद्धा फायलींचा निपटारा संपत नाही : शिक्षणाधिकारी

### प्रभारी शिक्षणाधिकारी पदाला एक महिना पूर्ण

सोलापूर : सोलापूर जिल्हा परिषदेचा सर्वात मोठा विभाग म्हणजे शिक्षण विभाग. या शिक्षण विभागामध्ये रोज शेकडोंच्या फायली येतात आणि जातात. त्यावर सह्या होतात परंतु फायलींच्या निपटारा हा लवकर संपतच नाही अशी खंत प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जाहीर यांनी व्यक्त केली.



शिक्षणाधिकारी जावीर यांच्या प्रभारी पदाला एक महिना पूर्ण झाला, त्यानिमित्त त्यांचीशी संवाद साधला असता ते बोलत होते. ते म्हणाले, जिल्हा परिषदेमध्ये मी उपशिक्षणाधिकारी म्हणून काम पाहतोय मात्र हे काम पाहत असताना काही फाईली या विभागून शिक्षणाधिकाऱ्यांकडे थेट जात होत्या तर काही माझ्याकडे येत होत्या. मात्र आता प्रभारी शिक्षणाधिकारी म्हणून जेव्हा मी काम पाहतोय तेव्हा दररोज हजारो फायली येतात व जातात. त्यावर रोज सह्या होतात. जिल्हा परिषदेमध्ये शिक्षकांची संख्या ही जवळपास साडेबारा हजार इतकी असून रोज शिक्षकांचे अनेक प्रश्न असतात, त्या सोडवण्यासाठी आलेल्या अर्जाची छाननी करावी लागते, पहावर लागते. त्यानंतर त्यावर सह्या कराव्या लागतातचे हे काम खरंच तारेवरची कसरत आहे, असेही जावीर यांनी सांगितले. जिल्हा परिषदेच्या कामकाजा संदर्भात ज्या दिवशी आलेले काम आहे त्याच दिवशी ते काम संपवावे अशी मनापासून इच्छा असते परंतु किती जरी काम गतीने करायचे ठरवले तरी ते काम संपत नाही. प्रभारी शिक्षण अधिकारी म्हणून माझ्याकडे प्रभारी पदभार आला. तेव्हापासून तर मी शनिवार, रविवारी सुट्टी न घेता कार्यालयीन कामकाजामध्ये मग्न असतो. माझ्या टेबलवरच्या ज्या फायली दिसत आहेत. पाहिली मी रोज त्याचदिवशी सह्या करून संपवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे चांगले काम केल्याचा आनंद मिळतो, असेही जावीर यांनी सांगितले.

### प्रत्येक काम मार्गी लावणार

वेळेत काम केल्यामुळे संबंधित शिक्षकांनाही त्याबाबत खूप बरे वाटते असे अनुभव मला या महिन्यांमध्ये आलेत. त्यामुळे शिक्षकांचे कुठलेही पेंडिंग फाईल न ठेवता तातडीने ते मार्गी लावण्यासाठी माझे याही पुढे असेच प्रयत्न राहणार असल्याचे प्रभारी शिक्षणाधिकारी जावीर यांनी सांगितले.



### सात रस्ता येथे ट्रॅफिकमध्ये रूग्णवाहिका अडकली

शहरातील सात रस्ता येथे दुपारच्या सुमारास ट्रॅफिकजाम झाले होते. या ट्रॅफिकमध्ये रूग्णवाहिका सुमारे अर्धातपास अडकली होती.